# महाराष्ट्र राज्याचे

# मराठी भाषा धोरण

## २०२३

भाषा सल्लागार समिती,

महाराष्ट्र राज्य

# मराठी भाषा धोरण
# २०२३

## - सादरकर्ते -


**लक्ष्मीकांत देशमुख**

**भा.प्र.से.(से.नि.)**

**अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती**

**आणि**

**सर्व सन्माननीय सदस्य**



**मराठी भाषा विभाग**

**महाराष्ट्र शासन**

# भाषा सल्लागार समिती, भाषा संचालनालय, मुंबई

## भाषा सल्लागार समिती
## (मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. भासस-२०२०/प्र.क्र.६/भाषा-१, दिनांक : ३० डिसेंबर, २०२१)

१) श्री.लक्ष्मीकांत देशमुख, अध्यक्ष
२) डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी, सदस्य
३) डॉ.पंडीत विद्यासागर, सदस्य
४) डॉ.अनंत पां.देशपांडे, सदस्य
५) डॉ.सुहास पळशीकर, सदस्य
६) डॉ.केशव सखाराम देशमुख, सदस्य
७) डॉ.हरिश्चंद्र बोरकर, सदस्य
८) डॉ.गिरीश दळवी, सदस्य
९) डॉ.चिन्मय धारुरकर, सदस्य
१०) डॉ.रमेश वरखेडे, सदस्य
११) डॉ.वंदना महाजन,सदस्य
१२) डॉ.प्रकाश परब, सदस्य
१३) श्री.किशोर कदम, सदस्य
१४) डॉ.मिलिंद जोशी,सदस्य
१५) प्रा.वैजनाथ महाजन, सदस्य
१६) डॉ.अनुपमा उजगरे, सदस्य
१७) डॉ.पृथ्वीराज तौर, सदस्य
१८) डॉ.पी.विठ्ठल, सदस्य
१९) श्री.सुरेश वांदिले, सदस्य
२०) श्री.अनिल गोरे, सदस्य
२१) श्रीम. अनुराधा मोहनी, सदस्य
२२) श्रीम.जयश्री देसाई, सदस्य
२३) श्री.प्रणव सखदेव, सदस्य
२४) श्री.प्रकाश होळकर, सदस्य
२५) डॉ.विवेक घोटाळे, सदस्य
२६) श्री.सयाजी शिंदे, सदस्य
२७) डॉ.गणेश एस. चंदनशिवे,सदस्य
२८) श्री.जयंत येलुलकर, सदस्य
२९) डॉ.शमशुद्दीन तांबोळी, सदस्य
३०) डॉ.राजीव यशवंते, सदस्य
३१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (मराठी भाषा विभाग),
३२)अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग),
३३) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)
३४) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)
३५) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई- .०१
३६) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - २५.
३७) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई -२५.
३८) संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# **मराठी भाषा धोरण**

## **अनुक्रमणिका**


| **अ.क्र.** | | **विषय** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | | ६-७ |
| २. | मराठी भाषेची सद्य:स्थिती आणि मराठी भाषा धोरणाची आवश्यकता | | ८-१५ |
| ३. | मराठी भाषा धोरणाची उद्दिष्टे | | १६ |
| ४. | मराठी भाषा धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये | | १७-१८ |
| ५. | मराठी भाषा धोरण : व्यवहारक्षेत्रनिहाय | | १९-५३ |
| | | शालेय शिक्षण | |
| | ५.१ | बालशिक्षण | |
| | ५.१.२ | प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण | |
| | ५.१.३ | उच्च शिक्षण | |
| | ५.२ | नवतंत्रज्ञान आणि मराठीचा वापर | |
| | ५.२.१ | प्रस्थापित संस्थांचा विकास, संस्थांची निर्मिती व नवीन नेमणुका | |
| | ५.२.२ | संगणन साधने, उपयोजने, निर्मिती व विकसन | |
| | ५.२.३ | संगणकीय शिक्षण | |
| | ५.३ | बोली भाषांचे जतन, संशोधन आणि दस्तावेजीकरण | |
| | ५.४ | लिपी शिक्षण | |
| | ५.५ | मराठी विद्यापीठ | |
| | ५.६ | विधि व न्यायव्यवहार | |
| | ५.७ | प्रशासनात मराठी भाषेचा वापर | |
| | ५.८ | वित्त व उद्योगजगत | |
| | ५.९ | प्रसारमाध्यमे | |
| | ५.१० | कोश निर्मिती | |
| | ५.११ | मराठी ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्यासाठीच्या उपाययोजना | |
| | ५.१२ | मराठी रोजगाराची भाषा म्हणून विकसित करण्याच्या उपाययोजना | |
| | ५.१३ | मराठी साहित्य, कला व संस्कृतीचा राज्यात, देशात व जगभरात प्रसार करणे | |
| | ५.१४ | बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषा व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे | |
| | ५.१५ | ग्रंथालय चळवळ बळकट करणे व ग्रंथालय धोरण आखण्याबाबत | |
| | ५.१६ | वाचन संस्कृती विकसित करणे | |
| | ५.१७ | मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी वित्तीय तरतूद | |
| | ५.१८ | मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत | |
| | ५.१९ | संकीर्ण | |
| ६. | मराठी भाषा धोरणाच्या कालबद्ध अंमलबजावणीचा कृती आराखडा | | ५४-५५ |
| ७. | मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये भाषा सल्लागार समितीची भूमिका व कामे | | ५६ |

"जैसी दीपांमाझि दिवटी।
कां तिर्थीमाझि पूर्णिमा गोमटी।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी ।
सर्वोत्तम।।१।।"

**- संत ज्ञानेश्वर**

"जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी
की परिमळामाजी कस्तुरी
तैसी भाषांमाजी साजिरी
मराठिया. "

**- फादर स्टीफन**

"जेथची नाव तरि मऱ्हाटी:
परिषड्दर्शनातें दळवटी
प्रमेय धांडोखिता सृष्टी : आधीचि ना "

**- नारायण बहाळिये व्यास (ऋद्धिपूरवर्णन : ३१)**

" मराठी असे आमुची मायबोली
जरी भिन्न धर्मानुयायी असू।
पुरी बाणली बंधुता अंतरंगी
हिच्या एक ताटात आम्ही बसू ।
हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू
वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरी ।
जगन्मान्यता हिस अर्पू प्रतापे
हिला बैसवू वैभवाच्या शिरी ।"

**- माधव जूलियन**

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा
हिच्या गगनात घुमे,
आद्य स्वातंत्र्याची द्वाही.
हिच्या पुत्रांच्या बाहूत,
आहे समतेची ग्वाही.

**-कवी कुसुमाग्रज**

"आमच्या देशातले उच्चशिक्षण हे मातृभाषेतूनच झाले पाहिजे. शिक्षण आम्हाला समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचवावयाचे असेल तर ते परक्या भाषेतून तेथपर्यंत जाणार कसे? आम्हाला सामान्य माणसाला मोठे करावयाचे आहे, पण अशाने सामान्य माणूस मोठा कसा होणार? त्याची सुरुवातीची सगळी शक्ती जर परकी भाषा शिकण्यात निघून गेली तर तो पुढे काय करणार आहे? याचा खरोखरी अधिक खोलवर विचार झाला पाहिजे..... ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही... तेव्हा ही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल. ते होऊ देता कामा नये, असे माझे स्वतःचे खंबीर मत आहे."

**-यशवंतराव चव्हाण ('युगांतर', पृ.१७२)**

## १. प्रास्ताविक

महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक भाषास-२०२०/ प्र.क्र.६/भाषा - १, दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली. सदर समितीस इतर अनेक महत्त्वाच्या कामांसोबत महाराष्ट्र राज्याचे साधारणपणे पुढील '२५ वर्षांचे मराठी भाषा धोरण ठरवणे' हे काम अग्रक्रमाने करण्याचे निदेश सदर शासन निर्णयाद्वारे देण्यात आले. त्याला अनुसरून नवीन पुनर्रचित समितीच्या सर्व मान्यवर सदस्यांच्या आम सहमतीने अंतिम केलेले प्रस्तुतचे 'मराठी भाषा धोरण २०२३' शासनास सादर करताना समितीस आनंद होत आहे. सदरचे धोरण हे सर्वंकष स्वरूपाचे व सर्व स्तरांवरील लोकव्यवहार, ज्ञान-अर्थ-प्रशासन आणि संवाद-संपर्क आणि अभिसरणासाठी उपयुक्त असेल, असा समितीस विश्वास वाटतो.

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात म्हणजेच सन २०१० मध्ये शासनास महाराष्ट्र राज्यात ज्ञान, वित्त, प्रशासन आणि लोकव्यवहारात मराठी भाषेतून ज्या प्रमाणात व्यवहार, संपर्क, संभाषण होणे अभिप्रेत होते व त्यासाठी घेण्यात आलेले निर्णय पुरेसे नव्हते, असे प्रकर्षाने जाणवल्यामुळे मराठी भाषा विकासाचे पुढील २५ वर्षांसाठीचे एक समग्र धोरण ठरविण्याचा निर्णय घेऊन दिनांक २२ जून २०१० रोजी न्या. नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समिती घटित करण्यात आली. पण त्यांच्या राजीनाम्यामुळे शासनाने, शासन निर्णय क्रमांक भाषास२०१२/प्र.क्र.३/भाषा-४ अन्वये दिनांक १२ मार्च २०१३ रोजी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना केली. सदर समितीने परिश्रमपूर्वक मराठी भाषा धोरणाचा मसुदा शासनाला सादर केला. पण त्यावर निर्णय झाला नाही. सदर समितीची मुदत संपल्यावर शासन निर्णय क्र. भाषास२०१५/प्र.क्र.३०/भाषा-१ अन्वये दिनांक ५ ऑगस्ट २०१५ रोजी डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितीची नव्याने पुनर्रचना करण्यात आली. या समितीने दिनांक ३० सप्टेंबर २०१६ रोजी कोत्तापल्ले समितीने तयार केलेल्या मसुद्याच्या आधारे वाटचाल करत मराठी भाषा धोरण तयार करून शासनास सादर केले. पण त्या काळात धोरणाबाबत शासन स्तरावर काही निर्णय होऊ शकला नाही. त्यानंतर सुमारे पाच वर्षांनी घटित झालेल्या विद्यमान भाषा सल्लागार समितीकडे नव्याने भाषा धोरण ठरविण्याचे काम सोपविण्यात आले आणि मधल्या काळात विविध क्षेत्रात झालेले बदल लक्षात घेऊन डॉ. कोत्तापल्ले व डॉ. मोरे समितीने सादर केलेल्या मराठी भाषा धोरणाचा फेरआढावा घ्यावा व नव्याने भाषा धोरणाचा अहवाल सादर करावा असे शासनाने निदेश दिले. त्याची फलश्रुती म्हणजे आज रोजी सादर होत असलेला 'मराठी भाषा धोरण २०२३' हा विद्यमान भाषा सल्लागार समितीने मा. अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली तयार केलेला अहवाल होय!

शासन व्यवहारात एक तत्त्व महत्त्वाचे असते, ते म्हणजे 'सातत्यासह बदल'. या तत्त्वानुसार डॉ. कोत्तापल्ले यांनी सादर केलेल्या मराठी भाषा धोरण अहवालातील बराचसा भाग व शिफारशी कायम ठेवत डॉ. मोरे समितीने काही नवीन भर घातली आणि विद्यमान समितीनेही या दोन्ही समित्यांच्या धोरणातील समान व महत्त्वाच्या शिफारशी (काही बदल करीत वा भर घालत) कायम ठेवत मागील दहा वर्षांतील बदल लक्षात घेऊन 'नवीन भाषा धोरण-२०२३' तयार केले आहे. विधिमंडळात व सार्वजनिक जीवनात लोकप्रतिनिधी, साहित्य विषयक संस्थांच्या मान्यवर व्यक्ती,

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे वार्षिक ठराव आणि अभ्यासकांनी वेळोवेळी लेख, भाषणे आणि परिसंवादामधून व्यक्त केलेल्या मतांचा लसावी काढला तर प्रामुख्याने मराठी भाषेवर इंग्रजी व हिंदी भाषेचे वाढते अतिक्रमण, पालकांचा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठविण्याचा वाढता ओढा व त्यामुळे विद्यार्थ्यांची मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीशी तुटत जाणारी नाळ, मराठी भाषा ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून पुरेशी विकसित झालेली नसणे, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र व आंतरजालात मराठीचे स्थान कमी असणे व भारतीय स्तरावरील विविध पुरस्कार व सन्मानात इतर भाषेच्या तुलनेत कमी स्थान असणे; या चिंता मराठी जनांना प्रकर्षाने जाणवत होत्या, हे अधोरेखित होते. त्यांचा पुरेसा ऊहापोह मागील दोन समित्यांत झाला नाही, म्हणून वर नमूद केलेल्या प्रश्नांवर विचार करून त्याबाबतच्या ठोस शिफारशी विद्यमान समितीच्या अनेक मान्यवर सदस्यांनी समितीपुढे आणल्या आणि त्यावर सविस्तर चर्चा व विचारविनिमय होऊन ‘मराठी भाषा धोरण २०२३’ अंतिम करण्यात आले. तथापि, ही समिती डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि डॉ. सदानंद मोरे यांच्या अहवालाची कृतज्ञतापूर्वक नोंद घेते. पण मागील दहा वर्षांत झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर सुमारे शंभर नव्या महत्त्वपूर्ण शिफारशींची भर घालणारा व आधीच्या दोन्ही अहवालांतील काही शिफारशी (काही ठिकाणी पुनर्लेखन करून) कायम ठेवणारा असा सर्वंकष स्वरूपाचा अहवाल आहे. तो ‘सातत्यासह बदल’ या शासनाच्या तत्त्वाचे शब्दश: आणि तत्त्वत: पालन करणारा आहे, असे आम्ही जाणीवपूर्वक नमूद करीत आहोत.

महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांचे मराठी भाषा धोरण २०२३ हे भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेच्या ध्येयधोरणाला अनुसरणारे आणि भाषावार प्रांतरचनेमागील दृष्टीकोन अधोरेखित करणारे आहे. प्रस्तुत भाषा धोरण केवळ मराठी भाषिकांच्या भौगोलिक सलगतेच्या अधिवासावर अधिष्ठित न राहता एकूण मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक आणि भावनिक ऐक्याच्या दृष्टीने “बृहन्महाराष्ट्राची संकल्पना जाणीवपूर्वक केंद्रस्थानी ठेवणारे आहे. देशातील विविध प्रांतांत व जगभरातील विविध देशांत निवासी असलेल्या मराठी भाषिक लोकांच्या महाराष्ट्राकडून असणाऱ्या अपेक्षांचाही विचार करून त्यासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. या धोरणाचा गाभा हा सामाजिक न्याय, लिंगनिरपेक्षता आणि विविधतेत एकता इत्यादी पायाभूत मूल्यांच्या संरक्षण आणि संवर्धनामधला भाषेचा वाटा लक्षात घेऊन या मराठी भाषा धोरणाची आखणी करण्यात आली आहे.

१ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषेबाबत पुढीलप्रमाणे उद्गार काढले होते. ‘मराठी भाषिक राज्याचे माझ्या मनात चित्र काढण्याचा मी प्रयत्न करतो तेव्हा मराठी जनता राजसिंहासनावर येऊन बसली आहे, असे चित्र उभे राहण्याऐवजी या सिंहासनावर मराठी भाषा विराजमान झाली आहे, असेच चित्र माझ्या मनात चितारले जाते. यासाठी मराठी भाषा ही अधिक प्रवाही, अधिक विचारवाही झाली पाहिजे.’ त्यांचे हे विचार पूर्णपणे साकार करण्यासाठी दिशा देणारे व सुयोग्य उपाययोजना सुचविणारे प्रस्तुतचे समग्र स्वरूपाचे मराठी भाषा धोरण-२०२३ आहे. सदरचे मराठी भाषा धोरण राज्यातील जनतेला आम्ही कृतज्ञतापूर्वक समर्पित करीत आहोत.

**=०=०=०=०=०=०=०=**

## २. मराठी भाषेची सद्य:स्थिती आणि मराठी भाषा धोरणाची आवश्यकता

***“आपण जेथे राहतो तो देश नाही, तर भाषा असते. लक्षात ठेवा, आपली मातृभाषा हीच आपली मातृभूमी असते.”***

**-एमिल सिओरान**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात जी अनेक मूल्ये विकसित झाली, त्यात भारतीय लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये लोक व शासन व्यवहार देशाच्या लोकभाषेत व्हावा हे एक प्रधान मूल्य होते. त्यानुसार स्वतंत्र भारतात भाषावार प्रांतरचना न्या. फझल अली आयोगाच्या शिफारशीप्रमाणे करण्यात आली. पण स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र प्रांताचे स्वप्न साकार होण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राचा लढा इथल्या नागरिकांना द्यावा लागला आणि १ मे १९६० रोजी आजचे मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली मराठी भाषा आणि संस्कृतीच्या विकासाला चालना मिळाली. लोकभाषा मराठी ही ज्ञानभाषा व्हावी हा त्यांचा दूरदृष्टीचा विचार होता. कारण त्याविना ‘मराठी समाजाचे जीवन कदापिही समर्थ, उन्नत व विकसित होणार नाही, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

लॉर्ड मॅकॉलेच्या धोरणात्मक अहवालाच्या आधारे ब्रिटन शासित स्वातंत्र्यपूर्व काळात लॉर्ड विल्यम बेंटिंक या गव्हर्नर जनरलच्या मान्यतेने ‘इंग्लिश एज्युकेशन ॲक्ट - १९३५’ पूर्ण भारत देशात लागू झाला आणि त्याद्वारे इंग्रजी ही ब्रिटिश इंडिया शासनाची आणि न्यायालयाची अधिकृत भाषा झाली, तसेच शिक्षणाची देखील भाषा झाली. ब्रिटिशांना खंडप्राय देशाचा कारभार चालविण्यासाठी इंग्रजी प्रशिक्षित भारतीय कर्मचारी व अधिकाऱ्यांची गरज होती. पण इंग्रजी भाषेमुळे भारतीयांना प्रबोधन युगानंतरच्या ब्रिटन व एकूणच पाश्चात्य देशातील आधुनिक ज्ञान-विज्ञान, तत्त्वज्ञान आणि लोकशाही - उदारमतवाद आदि मूल्यांची सुशिक्षित भारतीयांना ओळख झाली. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाला मोठ्या प्रमाणात भारतीय समाजजीवनात मान्यता मिळत गेली. पण त्याचा तोटा म्हणजे भारतातील देशी भाषांच्या विकासाची हेळसांड होत गेली. म्हणून भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळात भाषावार प्रांतरचनेचा विचार पुढे आला आणि स्वातंत्र्योत्तर काळात तो साकार झाला. परंतु बहुभाषिक भारतासाठी इंग्रजी ही संपर्क भाषा (Lingua Franca) एक अपरिहार्यता म्हणून स्वीकारण्यात आली, जी आजही कायम आहे. त्यामुळे इंग्रजीचे वर्चस्व महाराष्ट्रासह सर्वच प्रांतांमध्ये आपल्या भाषेच्या विकासासाठी प्रयत्न करूनही फारसे कमी झाले नाही. सन २०२१ च्या UDISE + (Unified District Information System for Education +) या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अहवालानुसार भारतात २६ टक्के विद्यार्थी हे इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकत आहेत, असे चित्र पुढे आले. म्हणजेच भारतातला प्रत्येक चौथा विद्यार्थी हा त्याच्या / तिच्या मातृभाषेऐवजी इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शालेय शिक्षण घेत आहे, हे त्या शासकीय आकडेवारीने सिद्ध झाले आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर हे प्रमाण ३३ टक्क्यांहून थोडे अधिक आहे कारण या राज्यातील प्रत्येक तिसऱ्या शालेय विद्यार्थ्याने मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाचा शालेय शिक्षणासाठी स्वीकार केला आहे. इंग्रजी ही आज भारतात ज्ञानाची भाषा म्हणून मोठ्या प्रमाणात प्रस्थापित झाली आहे व तिच्याद्वारे अधिक प्रमाणात चांगल्या

उत्पन्नाच्या व रोजगाराच्या संधी युवकांना प्राप्त होत आहेत, हे कटू असले तरी सत्य आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पालकांचा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठविण्याचा ओढा वाढत चालला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे अक्षरश: पेव फुटले आहे. त्याला शासनाचे विना अनुदानित तत्त्वावर इंग्रजी शाळांना मोठ्या प्रमाणात मंजुरी देण्याचे धोरणही कारणीभूत ठरले आहे, ही वस्तुस्थिती देखील नाकारता येणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर मागील ६३ वर्षांत मराठी भाषा आणि संस्कृतीचा अपेक्षित विकास झाला नाही, हे मान्य केले पाहिजे. त्याची जाणीव झाल्यामुळे महाराष्ट्राचे पुढील २५ वर्षांचे सर्वंकष स्वरूपाचे मराठी भाषा धोरण असावे, असा विचार पुढे आला. ते धोरण अंतिम करण्याची जबाबदारी शासनाने विद्यमान भाषा सल्लागार समितीवर सोपवली आहे.

भारताच्या संविधानातील आठव्या अनुसूचीद्वारे मराठीसह २२ भाषांना भारतीय गणराज्यांच्या अधिकृत राजभाषांचा दर्जा देण्यात आला आहे. इतर भाषांप्रमाणे मराठी भाषेचा इतिहास हा अभिमानास्पद आहे व तो तमिळ भाषेप्रमाणे व जवळपास तेवढाच दोन हजार वर्षांपेक्षा अधिक प्राचीन आहे. तिचा संक्षेपाने असा आढावा मराठी भाषा धोरण ठरविण्याच्या संदर्भात पार्श्वभूमीदाखल घेणे आवश्यक ठरते.

मराठी ही देशातील जवळपास एकदशांश लोकांची मातृभाषा आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात व संस्कृतीत तिचे अजोड असे स्थान आहे. त्यामुळे तिच्या एकंदर व्यवहारासंबंधीचे धोरण ठरवताना अनेक घटकांचा विचार अपरिहार्य ठरतो. मराठी भाषेचा विचार हा केवळ माध्यमापुरता मर्यादित नाही. तसा कोणत्याच भाषेचा विचार माध्यमापुरता सीमित राहू शकत नाही. भाषेचा विचार भाषेच्या इतिहासाइतका मागे जातो. भूतकाळाच्या प्रकाशातच वर्तमानकाळाला आणि भविष्यकाळाला अर्थ लाभत असतो. भाषेत जन्माला येणारे वाङ्मय भाषेच्या स्वरूपास विवक्षित रूप लाभण्यास साहाय्यकारी ठरत असते. वेगवेगळ्या काळातील राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती भाषेच्या जडणघडणीवर परिणाम करत असते. उदाहरणार्थ, तेराव्या शतकात महानुभाव संप्रदायाने 'महाराष्ट्री असावे' असा आग्रह धरला आणि संस्कृतऐवजी मराठीत ग्रंथरचना करण्याचे धोरण अवलंबले. 'तुमचा अस्मात्-कस्मात मी नेणें गा: मज श्रीचक्रधरे निरूपिली म-हाटीं : तियांचि पुसा :' असा मराठी भाषेचा आग्रह भट्टोबासांनी धरला होता. यादव राजांच्या काळात मराठी वाङ्मयाची भरभराट झाली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी ''माझा म-हाटाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिकें मेळविन ॥'' अशी प्रतिज्ञा केली. मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावण्यापूर्वी तीनशे - साडेतीनशे वर्षे अगोदरच संत नामदेवांनी पंढरपुरचा पांडुरंग पंजाबात नेला आणि मिश्र मराठी भाषेत काव्यरचना केली. संत एकनाथांनी 'एकनाथी भागवता'त ''हे टीका तरी मराठी। परि ज्ञानदानें होईल लाठी॥'' असा विश्वास व्यक्त केला. यानंतरच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहारकोश' सिद्ध केला. असे आणखीही तपशील सांगता येतील. मुख्य मुद्दा असा की, भाषेला केवळ संज्ञापनाचेच अंग नसते, अस्मितेचेही बलवत्तर अंग असते आणि ते दुर्लक्षिण्याजोगे नसते.

त्यामुळेच स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य जेव्हा १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले, तेव्हा राज्याचा अग्रक्रम मराठी भाषा व संवर्धन आणि विकासाचा असणे अपेक्षित होते. त्याची लखख

जाणीव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असतानाही यशवंतराव चव्हाणांना होती. त्याचे प्रतिबिंब दिनांक १३ फेब्रुवारी १९६० रोजी विदर्भ साहित्य संमेलनाच्या त्यांच्या उद्‌घाटनपर भाषणात पडलेले दिसून येते.

भाषिक राज्याच्या मागणीच्या पाठीमागे एकभाषिक जनतेच्या सांस्कृतिक विकासाचा जसा हेतू आहे, तशीच या राज्याच्या भाषेला महत्पदी बसविण्याचीही कल्पना आहे. म्हणून मराठी भाषेचे राज्य झाल्यावर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारसंपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे, ही जबाबदारी तिच्यावर आहे. याकरिता मराठी भाषा ही अधिक विचारप्रवाही व विचारवाही झाली पाहिजे.

पुढील काळात म्हणजे दिनांक ७ सप्टेंबर १९६७ मध्ये कोपरगाव येथे एका महाविद्यालयाच्या पायाभरणी समारंभात 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा' या विषयावरील केलेल्या भाषणात मराठीच्या संदर्भात एक महत्त्वाचा विचार यशवंतराव चव्हाणांनी पुढील शब्दात सूत्ररूपाने मांडला होता,

''मी हे सांगू इच्छितो की, उच्चशिक्षणासह (सर्व शिक्षण) हे मातृभाषेतूनच झाले पाहिजे. ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याविना आपल्या समाजाचे जीवन कदापिही समर्थ, उन्नत आणि विकसित होऊ शकणार नाही.''

त्यामुळे स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांच्या काळात (१९६० ते १९६२) त्यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली मराठी भाषा आणि संस्कृतीच्या विकासाला वेगाने प्रारंभ झाला. शासकीय कारभार मराठीतून करण्यासाठी शासन व्यवहार कोश तयार करण्यात आला. राज्यकारभाराच्या भाषेतील बदल सुकरतेने, योजनाबद्धतेने व निश्चित कालावधीत घडवून आणण्यासाठी आणि भाषा विकासासाठी भाषा संचालनालय स्थापन करण्यात आले. जगातल्या विविध भाषांतील अभिजात वाङ्मय आणि वैचारिक-शास्त्रीय ग्रंथ मराठीत भाषांतरित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ स्थापन केले गेले. मराठीत विश्वकोश आणि मराठी भाषेचा बृहत् शब्दकोश तयार करण्याचे कार्य हाती घेण्यात आले. मराठी लेखनविषयक नियमातले अराजक नष्ट करून शास्त्रशुद्ध असे लेखनविषयक नियम तयार करण्याची जबाबदारी साहित्य महामंडळावर सोपवण्यात आली. मुख्य म्हणजे कला आणि वाणिज्य विद्याशाखांच्या शिक्षणाचे माध्यम मराठी करण्यात आले. हे माध्यम यशस्वी व्हावे म्हणून मराठीत पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी विद्यापीठ पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाची स्थापना केली गेली. सर्वच ज्ञानशाखांतील सर्वच विषयांच्या पारिभाषिक संज्ञा निश्चित करण्यासाठी तज्ज्ञांच्या समित्या नेमण्यात आल्या. एकूणच मराठी ही लोकभाषा व ज्ञानभाषा होण्यासाठी हे सर्व उपक्रम होते.

मराठीचे हे एक ख्यातनाम विचारवंत व समीक्षक डॉ. सुधीर रसाळांनी भाषा संपन्नतेचे सूत्र सांगताना म्हटले आहे,

''कौटुंबिक व्यवहार, सार्वजनिक व्यवहार आणि शीर्षस्थ व्यवहार अशी मानवी समाजाची तीन जीवनक्षेत्रे असतात. बाजारात आणि रस्त्यावर होणारे सर्व व्यवहार हे सार्वजनिक व्यवहार असतात. ज्ञान, शासन आणि अर्थ या व अशा अन्य काही क्षेत्रांतले व्यवहार शीर्षस्थ व्यवहार असतात. जी भाषा जीवनाच्या या तिन्ही क्षेत्रांत उपयोजिली जाते, तीच भाषा सर्वार्थाने, संपन्न असते. यातही सातत्याने विकसित होत असणाऱ्या ज्ञानक्षेत्रात वापरली जाणारी भाषा अधिकच संपन्न बनलेली असते. ज्ञानक्षेत्रातील पाश्चात्त्य भाषांच्या वापरामुळे त्या अधिक संपन्न झाल्या आहेत.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील वापरासाठी त्या भाषेत शब्दसंग्रह, वाक्प्रयोग निर्माण झालेले असतात. जर ती भाषा एखाद्या जीवनक्षेत्रात वापरली जाईनाशी झाली, तर त्या भाषेची संपन्नता तेवढ्यापुरती कमी होते. शासन सोडल्यास अर्थ आणि ज्ञान या शीर्षस्थ क्षेत्रांत महाराष्ट्रात मराठी भाषा वापरली जात नाही. आता तर ती सार्वजनिक क्षेत्रातसुद्धा वापरली जाईनाशी झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातही जर मराठी वापरली गेली नाही, तर ती केवळ कौटुंबिक क्षेत्रापुरतीच शिल्लक राहील आणि शेवटी तिचे अस्तित्वच धोक्यात येईल.''

महाराष्ट्रापुढचे आजचे भाषिक संकट दुहेरी स्वरूपाचे आहे. एक म्हणजे महाराष्ट्र हे प्रगत औद्योगिक राज्य असल्यामुळे व मुंबई शहर भारताची आर्थिक राजधानी असल्यामुळे या राज्यात प्रारंभापासून इतर प्रांतातील लोक पोटापाण्याच्या व्यवसायासाठी सातत्याने येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या कमी होत आहे आणि महाराष्ट्र हा मराठी भाषिकांच्या ऐवजी बहुभाषकांचा प्रांत होत चालला आहे. त्यामुळे योग्य उपाययोजना केली नाही (किमानपक्षी-प्रस्तावित मराठी भाषा धोरण स्वीकारून ते अंमलात नाही आणले) तर भावी काळात येथील मराठी भाषा आणि मराठी संस्कृती अल्पसंख्याकांची बनण्याचा (किमानपक्षी मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद आदि महानगरांत) धोका नजरेआड करून चालणार नाही. सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात फक्त ६८ टक्के मराठी भाषिकांची नोंद झाली असून ३२ टक्के अन्य भाषिक आहेत. आगामी जनगणनेत हा आकडा आणखी कमी होण्याची शक्यता आहे. भारताच्या संविधानाने सर्व भारतीयांना संचार, निवास व रोजगारासाठी स्वातंत्र्य दिले असल्यामुळे येणारे अन्य भाषिक नागरिकांचे स्थलांतर थांबविता येणार नाही. अशीच परिस्थिती भारतातील अन्य प्रगत राज्यांची व मोठ्या शहरांची आहे. संकट हे नाही, तर महाराष्ट्रात येणारे अन्य भाषिक येथील मराठी भाषा न शिकता आयुष्यभर व्यवहार व संपर्काचा कोणताही प्रश्न न उद्भवता राहू शकतात. आज महाराष्ट्रात उच्च तांत्रिक-विज्ञान क्षेत्रातील रोजगार व संपर्काची भाषा इंग्रजी तर अर्धकुशल-अकुशल तसेच श्रमाधारित सेवाक्षेत्राची भाषा प्रामुख्याने हिंदी झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख शहरांची सार्वजनिक व्यवहाराची भाषा मराठी कमी व इंग्रजी-हिंदी अधिक अशी झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी भाषा आल्याविना गुजराण करणे शक्य नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली तरच अन्य भाषिक नागरिक मराठी शिकू लागतील. त्याशिवाय, शासनाने योग्य धोरण आखणे व परप्रांतीयांना मराठी भाषा शिकवण्याची सोय निर्माण करणे आवश्यक आहे. त्याविना इंग्रजी - हिंदीतून लोकव्यवहार करण्याचे संकट कमी होणार नाही.

महाराष्ट्रापुढे हिंदीपेक्षाही अधिक मोठे संकट हे इंग्रजीचे आहे. आज ज्या पालकांची आर्थिक क्षमता आहे, ते सर्वजण आपल्या पाल्यांना महागड्या शैक्षणिक फीचा खर्च सोसून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवत आहेत. आज महाराष्ट्रातला प्रत्येक तिसरा मुलगा हा इंग्रजी भाषेत शिकत आहे. त्यामुळे त्याची मराठी भाषेची व भाषा निगडित मराठी संस्कृतीची नाळ तुटत चालली आहे. जर इंग्रजीचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी समर्थ मराठी भाषेचा पर्याय त्यापुढे उभा केला नाही आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांना उदारपणे मोठ्या प्रमाणात परवानगी देणे व मराठी शाळा नव्याने मंजूर न करणे ही दुहेरी नीती राज्य शासनाने बंद केली नाही तर तीन पिढ्यांत असणारी मराठी भाषा बहुसंख्य शहरी घरांतून तीस वर्षांत हद्दपार होईल. पहिली इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणारी पिढी घरी आई-वडिलांशी

मराठीतून बोलेल, दुसरी पुढची पिढी आई-वडिलांशी इंग्रजीतून तर आजोबा-आजीशी मराठीतून बोलेल तर तिसरी पिढी आपल्या मुलांशी, तसेच आई-वडील, आजी-आजोबांशी सर्रास व पूर्णपणे इंग्रजीतूनच बोलेल व ते घर पूर्णत: अमराठी किंवा पूर्ण इंग्रजी होईल. ही काल्पनिक भीती मुळीच नाही. हे चित्र महाराष्ट्रातील मोठ्या शहरातील श्रीमंत व उच्च मध्यमवर्गीय घरात आजच ब-याच प्रमाणात दिसून येत आहे. ज्या पालकांना इंग्रजी माध्यमाची भरमसाठ फी परवडत नाही त्यांचीच मुले ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत तर शहरातील झोपडपट्टी व गरीब वस्तीतील मुले नगरपालिका/ महानगरपालिकांच्या मराठी शाळेत शिकत आहेत. ही केवळ भाषिक नाही तर शैक्षणिक विषमता आहे व त्याची रुंदी दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या बालवयात मातृभाषा शिकणे महत्त्वाचे व आवश्यक असते, त्या वयात इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इंग्रजी भाषा व त्याद्वारे अन्य विषय विद्यार्थी शिकत आहेत. इंग्रजी ही त्यांची नैसर्गिक मातृभाषा नसल्यामुळे त्यांची सारी शक्ती विषयाचे आकलन होण्यापेक्षा भाषा शिकण्यात अधिक खर्ची पडत आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेवर व त्यामुळे शिक्षणक्षमतेवर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे.

महात्मा गांधींनी हा धोका फार आधी ओळखला होता. 'यंग इंडिया' पत्रात त्यांनी एका लेखात विद्यार्थ्यांवर परकी भाषा माध्यमामुळे पडणाऱ्या ताणाबाबत चिंता व्यक्त करीत एक धोक्याचा इशारा दिला होता, तो असा होता 'इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणामुळे आमचे विद्यार्थी केवळ घोकंपट्टी व अनुकरण करणारे होतील' आणि आज तो धोका केवळ मराठी भाषिकांना नाही तर भारतातील सर्व प्रांतिक भाषिकांना कमी-जास्त प्रमाणात जाणवत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोग १९४८ मध्ये नेमण्यात आला होता. त्यांनी उच्च शिक्षणाचे इंग्रजी माध्यम यथाशीघ्र भारतीय भाषा करावे अशी महत्त्वाची शिफारस केली होती. पण मागील सात दशकांत महाविद्यालय व विश्वविद्यालयातील विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे शिक्षण पूर्णपणे इंग्रजी माध्यमातच चालू आहे. त्याचा देशाला व राज्याला किती फायदा झाला? १८५७ मध्ये इंग्रजांनी मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ही तीन विद्यापीठे सुरू केली, आज त्याचा मोठा विस्तार झाला असून २०२० च्या एका अहवालानुसार देशात एक हजारापेक्षा जास्त विद्यापीठे आणि ५२,६२७ महाविद्यालये कार्यरत आहेत, पण जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरमध्ये एकही भारतीय विद्यापीठ नाही. मागील पावणे दोनशे वर्षांत भारतातून जागतिक दर्जाचे किती शास्त्रज्ञ व संशोधक निर्माण झाले ? अगदी मोजके. असे का ? याचे समर्पक उत्तर केंद्र शासनाचे विद्यमान प्रधान वैज्ञानिक सल्लागार के. विजय राघवन यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे.

"भारतामध्ये इंग्रजीलाच एकमात्र विज्ञान व तंत्रज्ञानाची भाषा करताना अनेक आघाडीवर आपण या काळात कमी पडत गेलो. काही अपवाद सोडले तर आपल्याकडील उत्तमातील उत्तम शिक्षण संस्थासुद्धा केवळ इंग्रजीत शिक्षण देऊन जागतिक क्रमवारीत वरच्या क्रमांकावर आलेल्या नाहीत. Our best minds are merely be eloquent paraphraser of the ideas of others. आपली सर्वोत्तम मने (व मेंदू) केवळ इतरांच्या कल्पना वेगळ्या पद्धतीने मांडण्यातच पारंगत झाली आहेत."

त्यामुळे मातृभाषेतूनच शिक्षण का, याची डॉ. सुधीर रसाळांनी पुढीलप्रमाणे तर्कशुद्ध पद्धतीने मते प्रतिपादली आहेत.

''केवळ मातृभाषेतूनच शिक्षण का, हे नीट समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला विषय नीट कळण्यासाठी शिक्षण मातृभाषेतून दिले गेले पाहिजे, असे सर्वच शिक्षणतज्ज्ञ म्हणत असतात. मग यावर असाही युक्तिवाद केला जातो की, जर इंग्रजीवर प्रभुत्व असेल तर इंग्रजीतून शिकवला गेलेला विषय चांगल्याप्रकारे कळेल; म्हणून आधी विद्यार्थ्यांची इंग्रजीची चांगली तयारी करून घेतली पाहिजे. परंतु केवळ विषय नीट कळणे हा मातृभाषेतून शिक्षण देण्याचा मूळ उद्देश नाही. मातृभाषा हीच माणसाची एकमेव ज्ञानभाषा असते. ज्ञानभाषा म्हणून मातृभाषेची जागा अन्य भाषा घेऊ शकत नाही. म्हणून जी नैसर्गिकरीत्या माणसाची ज्ञानभाषा असते तिच्यातूनच माणसाला शिक्षण मिळाले पाहिजे.

मातृभाषा ही आपल्या विचारांची भाषा असते. आपली मातृभाषाच आपल्या संज्ञाप्रवाहाचे माध्यम असते. आपल्याला स्वप्नेही मातृभाषेतूनच पडत असतात. आपले उत्स्फूर्त उद्गार मातृभाषेतून निघत असतात. हात, पाय, नाक, डोळे या अवयवांप्रमाणे मातृभाषाही आपला नैसर्गिक अवयव बनून गेलेली असते. आपण ज्ञाननिर्मिती आणि वाङ्मयनिर्मितीही मातृभाषेतूनच करू शकतो. आपल्या देशात उत्तम प्रतीचे संशोधन होत नाही. कुठल्याही सामाजिक विज्ञानामध्ये आपले अभ्यासक मूलभूत भर घालत नाहीत. ज्ञानक्षेत्रात आपले स्थान दुय्यमच राहत आले. आपण विज्ञानापासून ते तत्त्वज्ञान-समीक्षा यांपर्यंत सर्वांचे ज्ञान पाश्चात्त्यांकडून आयात करत आलो. भारतीयांच्या इंग्रजी भाषेत होणा-या वाङ्मयनिर्मितीची साधी दखलही इंग्रजी समीक्षक घेत नाहीत. कारण त्यांना ते त्या लायकीचे वाटत नाहीत. हा सर्व परभाषेतून शिक्षण घेतल्याचा परिणाम आहे. आपणास जर सांस्कृतिक प्रतिष्ठा प्राप्त करून घ्यायची असेल, तर नवसर्जनक्षम स्वरूपाचे ज्ञान आपण मिळवले पाहिजे. असे ज्ञान फक्त मातृभाषेतूनच मिळत असते. त्यासाठी मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम झाले पाहिजे. ते जर झाले, तर आपल्या मातृभाषेतून आपण स्वतंत्रपणे वैज्ञानिक संशोधन करू आणि ज्ञानक्षेत्रात आपलीही सन्मानपूर्वक नोंद व्हायला लागेल.''

प्रस्तुतचे धोरण आखताना समितीने भारतीय व अर्थातच मराठी पालकांची आपल्या पाल्यांना करिअर व यशासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची मानसिकता लक्षात घेतली आहे. त्यामागे केवळ मराठीतून होणारा ज्ञानाचा आणि बाजाराचा (मार्केट) व्यवहार आपल्या पाल्याचे जीवन सुकर व सुखकर करण्यासाठी पुरेसा नाही, ही पालकांची भीती सद्य:स्थितीत साधार नाही, असे म्हणण्याजोगी स्थिती नाही, म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे त्यांचा ओढा उत्तरोत्तर वाढत आहे.

केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. लोकशाही जीवनपद्धतीचे जतन, संवर्धन आणि वर्धिष्णू होणे त्यावर अवलंबून आहे. त्यासाठी मराठीची अस्मिता प्रत्येक महाराष्ट्रीयाने बाळगणे व संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा अधिकाधिक प्रमाणात वापर करणे, हे जसे समस्त मराठी मातृभाषा असणाऱ्या मराठी जनांचे कर्तव्य आहे, तसेच त्यासाठी योग्य धोरण आखणे आणि अमराठी भाषिकांना मराठी शिकण्याची सोय करून त्यांनीही मराठीत सार्वजनिक कामकाज व संवाद - संपर्क इत्यादी करण्यासाठी प्रोत्साहित करणे हे राज्य शासनाचे काम आहे. त्यांना मराठी शिकल्या, समजल्या व संवाद केल्याविना सार्वजनिक व्यवहार करता येणार नाही, एवढा मराठीचा वापर वाढविला पाहिजे, तरच मराठीला उचित स्थान महाराष्ट्रात पुन्हा प्राप्त होऊ शकेल. त्यासाठी १९९६ मध्ये ज्यांचा जन्मदिन आपण सारे 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून साजरा करतो, त्या ज्ञानपीठ विजेत्या कवी

कुसुमाग्रजांनी 'स्वातंत्र्य देवतेची विनवणी' मध्ये दिलेला पुढील इशारा प्रस्तुतच्या मराठी भाषा धोरणाच्या सुयोग्य अंमलबजावणीने यथाशीघ्र कालबाह्य होण्यास मदत होईल.

'परभाषेतही व्हा पारंगत, ज्ञान साधना करा तरी ।
माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका ।
भाषा मरता देशही मरतो, संस्कृतीचाही दिवा विझे ।
गुलाम भाषिक होऊनि आपुल्या प्रगतीचे शिर कापू नका ॥

वरील काव्यपंक्तीतील 'परभाषेतही व्हा पारंगत' या कविवर्यांच्या विचारांचाही प्रस्तुत मराठी भाषा धोरणात आम्ही विचार केला आहे. भारताचे गुंतागुंतीचे भाषिक राजकारण आणि संपर्क भाषेच्या आवश्यकतेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. जोवर मराठी व अन्य भारतीय भाषा ज्ञान - विज्ञानाच्या संदर्भात इंग्रजीला ऐच्छिक स्वरूपात समर्थ पर्याय म्हणून प्रस्थापित होत नाहीत, तोवर इंग्रजीकडे पाठ फिरवून चालणार नाही. तसेच इंग्रजीकडे ओढा असणाऱ्या भारतीय पालकांची मानसिकताही तत्काळ बदलणे शक्य नाही.

ही केवळ एक समस्या नसून एक पेच (Crisis) आहे. त्याच्यावर मात करण्यासाठी कोणत्याही एका टोकाला जाणे समाजास परवडणार नाही. त्यातून व्यवहार्य मार्ग काढण्याची गरज आहे. कोणतीही टोकाची वा अतिरेकी भूमिका घेऊन चालणार नाही. भाषेचा व संस्कृतीचा अतूट संबंध लक्षात घेऊन आपण असे धोरण आखले पाहिजे की, आपले सांस्कृतिक स्वत्व (आयडेंटिटी) न सोडता जगाच्या बाजारात आपले स्थान निर्माण होईल. एकमेव इंग्रजीच्या (किंवा कोणत्याही परभाषेच्या) वापराने सांस्कृतिक स्वत्व धोक्यात आले तर केवळ मराठीच्या आग्रहामुळे मराठी माणसाचे व्यावहारिक अस्तित्वच संकटात येऊ शकते. अशा प्रकारे अस्मिता आणि अस्तित्व यांच्यातील हे द्वंद्व आहे.

या समस्येचा विचार दुसऱ्या एका चौकटीतूनही करता येतो. नव्या युगात अस्तित्व आणि अस्मिता यांच्यातील सीमारेषाही धूसर होऊ लागल्या आहेत. इंटरनेट, डिजिटल, सायबर तंत्रामुळे जे आज तरी आपल्याला इंग्रजीतून उपलब्ध आहे, ते पूर्वीच्या तंत्रज्ञानाप्रमाणे 'स्व-बाह्य' न राहता 'स्व'चा भाग बनू पाहत आहे. बंगलोरस्थित नव माध्यमाचे प्राध्यापक निशांत शहा यांनी म्हटल्याप्रमाणे, The digital is not just something we use strategically and specifically to do a few tasks. Our very perception of what we are, how we connect to the world around us, and the ways in which we define our domains of life, labour and language, are hugely structured by the digital technologies... The digital, far from being a tool, is a condition and context that defines the shapes and boundaries of our understanding of the self, the society and the structures of governance.'

प्रा. शहा या सर्वंकषतेचे सर्वज्ञात उदाहरण देतात, "If you, like the many millions of Indian, have registered for an Aadhar card, you have already been marked by digital identity whether or not you have broadband access."

थोडक्यात सांगायचे म्हणजे, हे नवीन तंत्रज्ञान जणू एका नव्या स्थलकालनिरपेक्ष संस्कृतीची रचनाच करीत आहे, की जिचे आपण सर्व घटक बनलो आहोत. मग ते आपणास ठाऊक असेल किंवा नसेल, आपली तशी इच्छा असेल किंवा नसेल.

आता येथे दोनच पर्याय शिल्लक राहतात. एक तर या मराठी भाषेला या नव्या सायबर संस्कृतीची भाषा बनवा किंवा जी या संस्कृतीची भाषा आहे किंवा जिच्यातून ही संस्कृती घडली त्या इंग्रजी भाषेला आत्मसात करा.

पहिला पर्याय कितीही आकर्षक असला तरी तो तात्काळ आजचा पर्याय होऊ शकत नाही. उलट दुसरा पर्याय अंतिम नसला तरीही तूर्तास तो स्वीकारून पहिल्या पर्यायाकडे येणे शक्य, व्यवहार्य आणि आवश्यक आहे. प्रस्तुतचे मराठी भाषा धोरण-२०२३ या समस्येचे समाधान शोधणारे आहे.

प्रस्तुत मराठी भाषा धोरण २०२३ हे जरी पुढील २५ वर्षांसाठीचे धोरण बनवले असले तरी त्यातील सर्व शिफारशींच्या आधारे शासन निर्णय व कृती कार्यक्रम आखणे व पुरेशी आर्थिक तरतूद करून धोरण मंजूर झाल्यापासूनच्या पहिल्या ५ वर्षांत पूर्णपणे कार्यान्वित केले आणि ते तद्नंतर त्याच गतीने राबविले तर सन २०४७ मध्ये म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षात मराठी भाषेचे महत्त्व पूर्ण भारतात (आणि जगातही) तिच्या अंगभूत सामर्थ्यासह प्रस्थापित होईल, एवढे हे धोरण सर्वंकष आहे. तेव्हा समस्त मराठी जन कविवर्य सुरेश भटांच्या महाराष्ट्र गौरवगीताप्रमाणे सार्थ अभिमानाने गाऊ लागतील,

‘लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी ।
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी ।
एवढ्या जगात माय मानतो मराठी ॥

प्रस्तुत मराठी भाषा धोरण २०२३ ची मांडणी एकूण सात भागात केली असून शेवटच्या भागात मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी वित्तीय तरतुदीबाबत ढोबळपणे शिफारशी केल्या असून अंमलबजावणीचा कृती आराखडा पण शेवटी विशद केला आहे.

सर्वात शेवटी सदर मराठी भाषा धोरण-२०२३ चा आराखडा सादर करताना भाषा सल्लागार समितीची शासनाला ही विनंती राहणार आहे की, सदर धोरण शासनस्तरावर यथाशीघ्र मंजूर होऊन पुढील आर्थिक वर्ष २०२३-२४ पासून त्याची अंमलबजवणी सुरू व्हावी. महाराष्ट्रातील सर्व मराठी प्रेमी नागरिक, पालक, साहित्य व कला-संस्कृती क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्था आणि मराठीतून आधुनिक ज्ञान-विज्ञान शिकता यावे व मराठी शिक्षणातून रोजगार मोठ्या प्रमाणात मिळावा यासाठी आतूर असणा-या तरुण पिढीच्या भावनांची शासन संवेदनशीलतेने उचित दखल घेऊन योग्य तो प्रतिसाद देईल, असा विश्वास वाटतो.

**=o=o=o=o=o=o=o=**

## ३. मराठी भाषा धोरणाची उद्दिष्टे

मराठी भाषेचा विचार हा महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती व एकंदर जीवनव्यवहार यांच्याशी संबंधित असणारे प्राणभूत तत्त्व आहे. महाराष्ट्राचे मराठी भाषेशी असणारे नाते जैविक स्वरूपाचे आहे. त्यामुळे मराठी भाषेचा वापर हा केवळ अस्मितेचा प्रश्न नसून तो मराठी माणसाच्या अस्तित्वाचाही प्रश्न आहे. तसेच सर्वसामान्य माणसाच्या जगण्याशी व महाराष्ट्राच्या विकासाशी निगडित हा प्रश्न आहे. हे सातत्याने दृष्टीपुढे ठेवून पुढील उद्दिष्टे आणि धोरणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. भारतीय स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षापर्यंत (२०४७) म्हणजेच पुढील २५ वर्षांत मराठी भाषा तिच्या अंगभूत सामर्थ्यासह ज्ञान आणि रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे.

२. जनमानसातील मराठी भाषेविषयीचा न्यूनगंड दूर करणे.

३. मराठी भाषेच्या साहाय्याने आपले भवितव्य उज्ज्वल होऊ शकेल असे आश्वासक वातावरण निर्माण करणे.

४. सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणे.

५. तालुका व जिल्हा स्तरावरील न्यायालयांमधून मराठी भाषेचा संपूर्ण वापर होईल अशी व्यवस्था निर्माण करणे. तसेच उच्च न्यायालयात मराठी भाषेला प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळवून देणे.

६. ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, कृषि, वैद्यकशास्त्र, विधि व अभियांत्रिकी इत्यादी सर्व ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षणासाठी मराठी माध्यम उपलब्ध करून देणे.

७. राष्ट्रीयीकृत अधिकोषांसह (बँकांसह) सर्व अधिकोष/बँकांमधील व्यवहार मराठी भाषेत होतील, हे कटाक्षाने पाहणे तसेच व्यापार, उद्योग, सहकार, सेवा आणि इतर वित्तीय क्षेत्रे यातील लेखापरीक्षणासह सर्व व्यवहार मराठी भाषेत होतील याची दक्षता घेणे.

८. प्रसारमाध्यमांचा उपयोग मराठी भाषेच्या विकासासाठी व प्रसारासाठी प्रभावीपणे करणे, जनसंपर्काच्या पारंपरिक आणि आधुनिक माध्यमांमध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करणे आणि जीवन व्यवहारातील नित्योपयोगासाठी उदा. परस्पर संप्रेषण, प्रशासकीय व्यवहार, रुग्णालये इत्यादी विविध ठिकाणी मराठी भाषेचा सहज वापर व्हावा या दृष्टीने भाषिक कौशल्ये विकसित करणे.

९. मराठी भाषेसमोरील आव्हाने कोणती आहेत याचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

१०. एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत स्वीकारण्याची प्रक्रिया जगभर सुरू असते. त्याचप्रमाणे मराठी भाषेतही अन्य भाषेतील शब्द आलेले आहेत. यापैकी कोणते शब्द प्रमाण मानावेत हे ठरविण्यासाठी म्हणजेच मराठी भाषेच्या प्रमाणीकरणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे.

११. मराठी भाषिकांची भाषिक क्षमता विकसित करण्यासाठी ठिकठिकाणी भाषा प्रयोगशाळा उभारणे आणि या प्रयोगशाळांचा वापर ज्यांना मराठी भाषा येत नाही, त्यांना मराठी भाषा शिकविण्यासाठी करणे.

१२. बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषिकांच्या समस्यांचे निराकरण करणे व त्यांच्या भाषाविषयक उपक्रमांना साहाय्य करणे.

१३. मराठी भाषेच्या विकासासाठी ज्या ज्या करणे आवश्यक असेल त्या त्या उपाययोजना करणे.

=०=०=०=०=०=०=०=

## **४. मराठी भाषा धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये**

१. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अनुसार मराठी भाषा ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे व ती ह्यापुढेही राहील. मराठीचे आजचे राजभाषा आणि लोकभाषा म्हणून असलेले स्थान अबाधित राखण्यासाठी तिची ज्ञानभाषा आणि रोजगाराची भाषा म्हणून जडणघडण होणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट समोर ठेवून कालबद्ध व नियोजनबद्ध प्रयत्न करण्यास राज्य शासन बांधील राहील.

२. मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची मुख्य भूमिका प्रस्तावित मराठी विद्यापीठ तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांची व महाविद्यालयांची राहील आणि त्यासाठी महाराष्ट्र शासन त्यांना वेळोवेळी साहाय्य करील.

३. मराठी भाषेच्या लिखित आणि मुद्रित व्यवहारांमध्ये देवनागरी लिपीचेच प्रचलन कायम राहील. भाषेचे जतन व संवर्धन यांमध्ये लिपीचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन देवनागरी लिपीच्या अभ्यासाला व संशोधनाला चालना देण्यात येईल. यासाठी शासन पुढाकार घेऊन जबाबदारी निश्चित करील.

४. राज्यातील भाषिक व सांस्कृतिक संचित असलेल्या मराठी भाषेच्या बोलींचे आणि मराठी लोकसाहित्य आणि लोककलांचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासन सतत प्रयत्नशील राहील.

५. मराठी भाषेला तिचे न्याय्य स्थान मिळवून देण्यासाठी मराठी भाषकांना तद्नुषंगिक संधी उपलब्ध करून देणे आणि त्यासाठी मराठी भाषेचा वापर सर्वच क्षेत्रात करणे आवश्यक आहे. मराठी ही महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रांतील संपर्क, संवाद, आणि वापराची भाषा व्हावी यासाठी कर्नाटक सरकारने जसा कन्नड भाषा विकास प्राधिकरणाचा कायदा केला आणि अंमलात आणला त्या धर्तीवर "मराठी भाषा विकास प्राधिकरण अधिनियम" केला जाईल व त्याची सुयोग्य अंमलबजावणी केली जाईल.

६. नवतंत्रज्ञानाचे स्थानिकीकरण अर्थात मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने-सुसज्ज केले जाईल. त्यासाठी संस्थात्मक यंत्रणा प्रस्थापित करणे, संगणकीय साधनांची निर्मिती व त्यांचे अद्ययावतीकरण करणे तसेच मराठी संगणकीय वापराचे प्रशिक्षण देणे आदि गोष्टी केल्या जातील.

७. महाराष्ट्र शासनाने मान्य केलेले मराठी विद्यापीठ त्वरित स्थापन केले जाईल व या माध्यमातून मराठी भाषा आधुनिक ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची तसेच रोजगाराची भाषा करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल. या आणि निश्चित केलेली अन्य ध्येयधोरणे व उद्देश्यपूर्तीसाठी योग्य व व्यवहार्य धोरणे आखून ती साकार करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला जाईल आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

८. राज्यातील तालुका व जिल्हा पातळीवरील न्यायालयांच्या कामकाजाची भाषा दि. २१ जुलै १९९८ च्या अधिसूचनेप्रमाणे मराठी आहे, त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल.

९. संविधानातील अनुच्छेद ३४८(२)च्या तरतुदीप्रमाणे मराठी भाषेला मुंबई उच्च न्यायालयात विनाविलंब प्राधिकृत भाषेचा दर्जा दिला जाण्यासाठी उचित कार्यवाही केली जाईल.

१०. राज्याच्या प्रशासनात मराठी भाषेचा प्रभावी वापर होण्यासाठी महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील कलम ६ अन्वये नियमावली व आवश्यक उपाययोजना केली जाईल. तसेच प्रशासनातील मराठी भाषेच्या वापराबाबतच्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल.

११. त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र सरकारच्या आस्थापनांमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य करून त्यावर देखरेख ठेवली जाईल व पाठपुरावा करण्यात येईल.

१२. वित्त व उद्योगजगतात मराठी भाषेचा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहनपर योजना राबवल्या जातील.

१३. विविध व्यवहारक्षेत्रांमध्ये व ज्ञानशाखांमध्ये मराठीचा गुणवत्तापूर्ण वापर व्हावा यासाठी मराठीतील कोशवाङ्मय समृद्ध व अद्ययावत केले जाईल.

१४. मराठी ही ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतील आणि नजीकच्या भविष्यात ती सर्वार्थाने इंग्रजीला ऐच्छिक पर्याय म्हणून विकसित केली जाईल.

१५. मराठी ही अधिकाधिक रोजगाराची भाषा व्हावी यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतील व रोजगारात मराठी माणसांचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील.

१६. मराठी भाषा, साहित्य व कला- संस्कृतीचा, राज्य, देश व जगभरात प्रसार व्हावा यासाठी विशेष प्रयत्न शासनाच्या सर्व विभागांमार्फत केले जातील व मराठीला राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर एक महत्त्वाची भाषा म्हणून प्रस्थापित केले जाईल.

१७. देशातील इतर राज्ये व शहरांत राहणाऱ्या मराठी भाषिकांना आपली मराठी भाषा व संस्कृती जतन व वर्धिष्णू करण्यासाठी सर्वतोपरी मदत व सहकार्य केले जाईल. त्यासाठी मराठी भाषा विभागात एक वेगळा कक्ष स्थापन केला जाईल.

१८. भाषा सल्लागार समितीने तयार केलेले व शासनाने स्वीकारलेले मराठी भाषा धोरण राज्य शासनाचे सर्व विभाग, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, आस्थापना, स्वायत्त संस्था तसेच शासनमान्य, अशासकीय अनुदानित व मान्यताप्राप्त संस्था यांना बंधनकारक राहील. तसेच यांच्यापैकी कोणताही विभाग अथवा संस्था यांना आपले भाषाविषयक धोरण ठरविताना ते या मराठी भाषा धोरणाशी सुसंगत राहील याची दक्षता घेणे बंधनकारक राहील. अन्यथा ते निरस्त समजण्यात येईल.

१९. शालेय वयात विद्यार्थ्यांवर जाणीवपूर्वक वाचन संस्कार करून आणि ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देत महाराष्ट्राची वाचन संस्कृती विकसित व उन्नत करण्यात येईल.

२०. मराठी भाषा धोरणाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी मराठी भाषा विभागाकरिता दरवर्षी किमान १०० कोटींची तरतूद केली जाईल व टप्प्याटप्प्याने ती ५०० कोटींपर्यंत वाढवण्यात येईल.

२१. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तयार करण्यात आलेल्या या मराठी भाषा धोरणाचे दर पाच वर्षांनी पुनर्विलोकन करण्यात येईल.

उपरोक्त मराठी भाषा धोरणाला अनुसरून व्यवहारक्षेत्रनिहाय उपाययोजना पुढील प्रकरणात सुचविल्या आहेत.

=०=०=०=०=०=०=०=

# ५. मराठी भाषा धोरण : व्यवहारक्षेत्रनिहाय

## शालेय शिक्षण

## (बालशिक्षण, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण)

## भूमिका

मराठी भाषा धोरणाचा एक मुख्य उद्देश राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मराठीतून मिळाले पाहिजे हा आहे. मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार आहे. कारण कोणतेही ज्ञान, त्यातील सैद्धांतिक भाग योग्य आकलनासह परक्या भाषेपेक्षा आपल्या मातृभाषेतून अधिक सहजतेने आत्मसात होऊ शकतो, हा आता जगभर मान्य झालेला सिद्धांत आहे. सबब हे भाषा धोरण  मराठी भाषेतून उत्तम, कल्पक आणि प्रयोगशील शालेय शिक्षण देण्यावर भर देणारे आहे. पण त्याच वेळी देशात आज असणारे इंग्रजी भाषेचे महत्त्व व तिचे आधुनिक ज्ञान,विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रेसरत्व नजरेआड करून चालणार नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढती संख्या आणि पालकांचा त्याकडे असणारा ओढा लक्षात घेता "उत्तम इंग्रजीसह उत्तम मराठी" या तत्त्वाचा हे भाषा धोरण पुरस्कार करते. पुढील काळात ज्ञानभाषा असणाऱ्या  इंग्रजीला मराठी ही समर्थ पर्याय कशी बनेल यावर हे भाषा धोरण उपाययोजना सुचविते.

मराठी भाषा धोरणातील शिक्षणविषयक भाषा धोरण महाराष्ट्रातील सर्व अनुदानित, विनाअनुदानित, शासन मान्यताप्राप्त कोणत्याही माध्यमाच्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था, संशोधन प्रयोगशाळा, शैक्षणिक प्रकल्प व अन्य शैक्षणिक उपक्रम चालविणाऱ्या सर्व शिक्षण संस्थांना लागू राहील.

१. महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचे माध्यम हे प्रामुख्याने व प्राधान्याने मराठी भाषाच असेल. तसेच मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून अनिवार्यपणे इंग्रजी भाषा शिकविण्याचे धोरण यापुढेही कायम राहील.

२. 'महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीने अध्ययन व अध्यापन अधिनियम, २०२०' अन्वये इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत सर्व अमराठी माध्यमांच्या शाळेत मराठी शिकविणे अनिवार्य केले आहे, त्याची व्याप्ती वाढवून, मराठी ही बारावी इयत्तेपर्यंत अनिवार्य करण्यात येईल.

३. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० मध्ये तीन ते सहा वयोगटातील शाळापूर्व शिक्षणाचा प्रथमच समावेश केला आहे. त्यामुळे अंगणवाडी/बालवाडी (मराठी) व मॉंटेसरी/के.जी. (इंग्रजी) या शाळापूर्व शिक्षण केंद्रात मराठी-इंग्रजी अशा दोन्ही भाषांचा उपयोग करण्यासाठी कायदा करण्यात येईल.

४. उच्च माध्यमिक स्तरापासून म्हणजे आठवी ते बारावी, पदवी व पदव्युत्तर अशा सर्व स्तरावर भाषा विज्ञानाचा अभ्यासक्रम मराठी भाषेच्या शिक्षणात योग्य प्रमाणात अंतर्भूत करण्यात येईल.

५. शिक्षणाच्या सर्व स्तरांवर केवळ मराठी एक भाषिक किंवा इंग्रजी एक भाषिक अध्ययन व अध्यापन यांऐवजी मराठीसह इंग्रजी आणि इंग्रजीसह मराठी अध्ययन व अध्यापन असे धोरण राहील. हे धोरण प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी सर्व विषयांच्या अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके मराठी आणि इंग्रजी या दोन भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. यानुसार परीक्षापद्धतीतही बदल करण्यात

येतील. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका दोन्ही भाषांत उपलब्ध करून दिल्या जातील आणि विद्यार्थ्यांना आपल्या पसंतीच्या भाषेत उत्तरपत्रिका लिहिण्याचा पर्याय देण्यात येईल.

६. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण मंडळ वा शिक्षण समित्या आपल्या स्तरावर शिक्षणाच्या माध्यमात शिक्षणतज्ज्ञाचा सल्ला न घेता बदल करतात व त्यातही सातत्य राहत नाही. त्यामुळे यापुढे असे बदल फक्त राज्याच्या शालेय शिक्षण मंत्रालयाच्या स्तरावर व मराठी भाषा विभागाच्या सहमतीनेच भाषा धोरणाच्या परिप्रेक्ष्यातच केले जातील.

७. राज्यात शिक्षक स्वयंप्रेरणेने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अनेक कल्पक व उपयुक्त असे शैक्षणिक प्रयोग करीत असतात व त्याचे चांगले सकारात्मक बदल पहायला मिळतात. अशा प्रयोगशील शिक्षकांना उत्तेजन देणे, त्यांच्या प्रयोगाचे मूल्यमापन करून ते राज्यभर राबविणे शक्य आहे का हे ठरविणे व त्याचा विस्तार करणे शालेय शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक ‘प्रयोगकेंद्र’ (एक्स्पेरिमेंटल हब ) निर्माण करण्यात येईल.

## ५.१ बालशिक्षण

५.१.१ बालशिक्षणतज्ज्ञ, बालमानसशास्त्रज्ञ, मेंदू शास्त्रज्ञ, लिपीतज्ज्ञ व भाषातज्ज्ञ यांच्या सहकार्याने बाल शिक्षणाचा भाषा परिचयाच्या दृष्टीने सर्वांगीण विचार करण्यात येईल.

५.१.२ शिशुशाळांमधील अभ्यास आराखड्यांचे प्रमाणीकरण भाषिक अंगाने केले जाईल.

५.१.३ विशेषत: आदिवासी बोली क्षेत्रातील बाल शिक्षणाचा स्वतंत्र विचार करून या मुलांच्या शिक्षणपूर्व तयारीच्या दृष्टीने सर्व संबंधित शिक्षकांसाठी/ अंगणवाडी सेविकांसाठी प्रमाणभाषा आणि संबंधित बोलीभाषा अशा संमिश्र पद्धतीची प्रमाणित प्रशिक्षण व्यवस्था निर्माण केली जाईल.

५.१.४ ३ ते ६ वयोगटाच्या बालकांच्या शाळापूर्व किंवा प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षणाला (ECCE) नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये अग्रक्रम दिला असल्यामुळे शाळापूर्व शिक्षण सर्व बालकांना मिळणे आवश्यक असल्यामुळे शंभर टक्के प्रवेश वा पटनोंदणीसाठी आणि गळती न होऊ देण्यासाठी सर्व शिक्षण अभियानाप्रमाणे एक नवे अभियान शालेय शिक्षण व महिला व बालकल्याण विभाग संयुक्तपणे सुरू करील.

५.१.५ बालशिक्षण (वयोगट ३ ते ७ म्हणजे इयत्ता दुसरीपर्यंत) विभागासाठी एक स्वतंत्र "बाल शिक्षण मंडळ वा संचालनालय" निर्माण करण्यात येईल. तसेच बालशिक्षण विभागासाठी तीन ते पाच तज्ज्ञ व्यक्तींचे एक सल्लागार मंडळ स्थापन करून त्यांच्या मार्फत नवीन संशोधन, अनुभव आदिंच्या आधारे वेळोवेळी नवीन उपक्रम, अंमलबजावणी व सामाजिक अंकेक्षण (social audit) केले जाईल.

५.१.६ लहान मुलांच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी ८५ टक्क्यांहून अधिक विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो म्हणून ०-३ वयोगटातील बालकांच्या प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षणासाठी (ECCE) पालकांना कार्यात्मक पुस्तिका आणि दृकश्राव्य माध्यमाद्वारे साहित्य उपलब्ध करून मुलांच्या शाळापूर्व शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी प्रबोधन केले जाईल.

## ५.१.२ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

५.१.२.१ महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी ही प्रथम भाषा असेल आणि तेथे मराठीचे दर्जेदार अध्यापन व्हावे यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

५.१.२.२ मराठी शाळांची गुणवत्ता वाढवून तिचा दर्जा इंग्रजी शाळांच्या तुलनेत स्पर्धात्मक करायचा असेल तर तेथे उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करणे आणि शिक्षकांचे अधिक प्रभावी प्रशिक्षण होणे आवश्यक आहे त्यासाठी शालेय शिक्षण विभाग विशेष प्रयत्न करील. तसेच मराठी शाळेत दर्जेदार इंग्रजीचे अध्यापन होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत संभाषण करता आल्याखेरीज पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडचा ओढा कमी होणार नाही. त्यासाठी शालेय शिक्षण विभाग मराठी शाळेत पहिलीपासून असलेले इंग्रजी भाषेचे शिक्षण देणारी इंग्रजी अध्यापन प्रशिक्षणाची यंत्रणा माहिती व तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करीत अधिक दर्जेदार करील व त्याद्वारे विद्यार्थ्यांना इंग्रजीचे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल.

५.१.२.३ खाजगी विनाअनुदानित इंग्रजी शाळांची अवस्था व दर्जा काही मोठ्या संस्थांच्या शाळांचा अपवाद वगळता फारसा समाधानकारक नाही. पुन्हा त्यांचे सनियंत्रण नीट होत नाही. त्यामुळे अशा असमाधानकारक दर्जाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढावी म्हणून प्रभावी संनियंत्रण आणि उत्तेजन अशा मार्गाने त्यांचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

५.१.२.४ एकूणच मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये दर्जेदार इंग्रजी शिक्षण तर अमराठी भाषिक माध्यमांच्या इंग्रजीसह सर्व माध्यम आणि मंडळांच्या शाळेत दर्जेदार मराठी शिक्षण देण्यासाठी विशेष लक्ष पुरविले जाईल आणि त्यासाठी योग्य संनियंत्रणाची कायदेशीर यंत्रणा निर्माण केली जाईल.

५.१.२.५ मराठीचा समान दर्जा राखण्यासाठी सर्व अमराठी माध्यमाच्या शाळांमध्ये बालभारतीची मराठी भाषेची पाठ्यपुस्तके लागू केली जातील.

५.१.२.६ देवनागरी अक्षर ओळख, अक्षर सराव पुस्तिका यातील अक्षराकारांचे प्रमाणीकरण केले जाईल. लिपीचे अध्यापन करताना लिपी ही मुळात दृष्यात्मक चित्रकृती आहे हे लक्षात ठेवून अध्यापन पद्धती विकसित करण्यात येईल. लिपीतील अक्षर ओळख व हस्ताक्षर अध्ययनासाठी टंकनिर्मिती आणि पाठनिर्मिती केली जाईल.

५.१.२.७ महाराष्ट्रातील सर्व शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी वार्षिक मूल्यमापनाची व्यवस्था निर्माण केली जाईल आणि शाळांच्या श्रेणी ठरवल्या जातील. कमी श्रेणीच्या शाळा वरच्या श्रेणीत येण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

५.१.२.८ शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील बंद पडलेल्या बालचित्रवाणीची पुनःस्थापना करण्यात येईल. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रम शिकविणे आणि आधुनिक ज्ञान-विज्ञान, संविधान, इतिहास आणि भारतीय मूल्यांचे ज्ञान दृकश्राव्य माध्यमाद्वारे देण्यासाठी बालचित्रवाणी उत्तम दर्जाचे कार्यक्रम, मालिका आणि इतर साहित्य निर्माण करील.

५.१.२.९ अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार शैक्षणिक साधने निर्माण केली जातील. यात भारतीय शैलीच्या चित्रांना, भारतीय चित्रविषयांना प्राधान्य दिले जाईल.

५.१.२.१० मराठी भाषेच्या वैविध्यपूर्ण वापरासाठी पूरक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन शालेय स्तरावर करण्यात येईल. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनात मराठी

कार्यक्रमांचा समावेश असेल. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी व विकसित व्हावी यासाठी प्रयत्न केला जाईल. त्यासाठी शालेय ग्रंथालये सुसज्ज करण्यात येतील. तसेच दरवर्षी प्रत्येक तालुक्यात शालेय साहित्य व भाषा संमेलन आयोजित करण्यासाठी खास योजना तयार करण्यात येईल.

५.१.२.११ प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार करून मराठीच्या विविध बोलींमध्ये अक्षर ओळख तक्ते/शब्दकोश तयार केले जातील. बोलींबाबत ज्या संस्था काम करत आहेत, त्यांची आवश्यक तेथे मदत घेतली जाईल.

५.१.२.१२ मराठी समाजसंस्कृतीच्या उपसंस्कृती असलेल्या आदिवासी, भटके विमुक्त व तत्सम जाती आणि जमाती यांच्या बोलीभाषा आणि सांस्कृतिक संचित यांचा परिचय शालेय अभ्यासक्रमातून व अन्य उपक्रमातून करण्यात येईल. तसेच मराठी समाजसंस्कृतीच्या उपसंस्कृती नसलेल्या मात्र महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्या सर्व आदिवासी, भटके विमुक्त व तत्सम जाती, जमाती यांच्या बोली व सांस्कृतिक संचिताचा परिचय शालेय अभ्यासक्रम व अन्य उपक्रमातून करून देण्यात येईल.

५.१.२.१३ मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन यांच्या गरजेनुसार तंत्रज्ञान विकसित केले जाईल व त्या तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

५.१.२.१४ सर्व राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा, राष्ट्रीय अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा, बँकिंग परीक्षा, केंद्र व राज्य स्तरावरील सर्व प्रकारच्या शासकीय सेवाप्रवेश परीक्षा देताना महाराष्ट्रातील परीक्षार्थींना पूर्व परीक्षा आणि मुख्य परीक्षा यांच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेत उपलब्ध व्हाव्यात तसेच उत्तराची भाषा म्हणून मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी शासन केंद्र सरकारकडे मागणी व पाठपुरावा करील.

५.१.२.१५ पूर्व माध्यमिक स्तरावर त्रिभाषा सूत्रानुसार मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन विषयांचा अंतर्भाव केला जातो, त्यात हिंदी सोबत स्थानिक बोली जोडून त्यांचा संयुक्त अभ्यासक्रम शिकविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

५.१.२.१६ अमराठी विद्यार्थी तसेच अमराठी माध्यमातील विद्यार्थी यांच्यासाठी मराठी भाषाविषयक विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

५.१.२.१७ आदिवासी भागात जेथे प्रमाण मराठी भाषा बोलली जात नाही अशा गोंडी, कोरकू आदि भाषा बोलणाऱ्या मुलांसाठी त्या त्या बोलीभाषा व मराठी प्रमाणभाषेमध्ये द्वैभाषिक हस्तपुस्तिका, पाठ्यपुस्तके आणि ध्वनिचित्रफिती निर्माण केल्या जातील व क्रमशः या मुलांना वरच्या वर्गात प्रमाण मराठी भाषेकडे सहजतेने वळविले जाईल. सर्व विद्यार्थ्यांना बोलीभाषेचा परिचय व्हावा म्हणून बालभारतीच्या प्रत्येक इयत्तेच्या पाठयपुस्तकात बोलीभाषेतील किमान एक धडा आणि काही छोट्या कवितांचा समावेश केला जाईल.

५.१.२.१८ विज्ञान व गणिताच्या संकल्पना समजणे सोपे जावे व पाठांतराऐवजी आकलनाद्वारे विषय आत्मसात करणे सुलभ व्हावे यासाठी मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये पाठ्यपुस्तके (आणि ध्वनिचित्रफिती) निर्माण करून ती उपलब्ध करून दिली जातील.

५.१.२.१९ मराठीची ज्ञानभाषा म्हणून पायाभूत जडणघडण व्हावी व ज्ञानाच्या विविध क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर करण्याच्या क्षमता नव्या पिढीत रूजवाव्यात यासाठी पायाभूत मराठीचा विकास

व समृद्ध बालसाहित्य निर्मितीला चालना देणारा कृतिकार्यक्रम आखण्यात येईल. या कृतिकार्यक्रमात विचारांचे व्याकरण, सर्जनशील विचारप्रक्रियेची भाषिक उपकरणे, लोकभाषा आणि ज्ञानभाषा यांची सांगड घालणारे वाचनसाहित्य निर्माण करण्यावर भर देण्यात येईल. दृक-श्राव्य व संगणकीय माध्यमांतील भाषिक सर्जनशीलतेचा पैस विस्तारण्यासाठी विविध माध्यमांच्या अंगभूत क्षमतांचा भाषिक कौशल्यांच्या उपयोजनात वापर वाढविण्यासाठी आंतरज्ञानशाखीय दृष्टीतून 'पायाभूत मराठी व बालसाहित्य निर्मिती' ची ज्ञानशाखा विकसित करण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले जातील.

५.१.२.२० शालेय शिक्षणात किमान पाचवीपासून माहिती व तंत्रज्ञान शिक्षणाचा समावेश करण्यात येईल. त्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येईल आणि प्रत्येक शाळा डिजिटल शाळा म्हणून पुढील पाच वर्षांत विकसित केली जाईल.

५.१.२.२१ शिक्षक प्रशिक्षण व मूल्यांकन अधिक वस्तुनिष्ठ होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल.

## ५.१.३ उच्च शिक्षण

५.१.३.१ राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामकाजात इंग्रजीसोबत मराठीचाही वापर अनिवार्य असेल. तसेच त्यांच्या परिसरातील, वास्तूंतील नावे, सूचनाफलक इत्यादी सर्व बाबतीत मराठी भाषेचा ठळकपणे वापर करणे बंधनकारक राहील.

५.१.३.२ राज्यातील सर्व प्रकारची महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांची संकेतस्थळे मराठी भाषेतही उपलब्ध करून देणे बंधनकारक केले जाईल.

५.१.३.३ राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांनी, त्यांना अनुदान आयोगासारख्या नियामक संस्थांकडून संशोधनासाठी मिळणाऱ्या निधींपैकी यथोचित निधी विविध ज्ञानशाखांतील मराठी भाषेतून होणाऱ्या संशोधनपर लेख, प्रबंधासाठी तसेच इंग्रजीसह अन्य भाषेतून मराठीमध्ये अनुवादाच्या रूपाने संशोधनपर लेख व प्रबंध प्रकाशित होण्यासाठी खर्च करण्याची परवानगी मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल. राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत यासाठी विद्यापीठांना मदत केली जाईल.

५.१.३.४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींनुसार महाविद्यालयीन व विद्यापीठीय उच्च शिक्षण मराठीतूनही उपलब्ध करून दिले जाईल.

५.१.३.५ विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक उच्च शिक्षण मराठी माध्यमातून उपलब्ध केले जाईल.

५.१.३.६ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमामध्ये नुकत्याच करण्यात आलेल्या सुधारणेनुसार 'मराठी भाषा जतन-संवर्धन मंडळ' ही नवी यंत्रणा प्रथमच निर्माण केली असून मराठी माध्यमातून सर्व विषयांचे अध्ययन, अध्यापन केले जाईल हे बघण्याची जबाबदारी या यंत्रणेवर सोपविण्यात आली आहे. ही यंत्रणा अधिकाधिक सक्षम व समर्थपणे कार्य करील अशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारच्या विद्यापीठांशी संलग्न आणि स्वायत्त महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांची दर तीन वर्षांनी मराठी भाषाविषयक सर्वांगीण तपासणी (मराठी लँग्वेज ऑडिट) करण्यात येईल. त्यासाठी सविस्तर नियमावली करण्यात येईल.

या भाषा लेखापरीक्षेनुसार वरील संस्थांना मानांकने दिली जातील आणि  अर्थसाहाय्य व सवलती देताना या मानांकनांचा विचार केला जाईल.

५.१.३.७ उच्च शिक्षणात व्यावहारिक व उपयोजनलक्ष्यी शाखानिहाय मराठी भाषेच्या अध्यापनाची व्यवस्था करण्यात येईल.

५.१.३.८ विद्यापीठीय शिक्षणात मराठी विषय किमान चार सत्रांसाठी अनिवार्य करण्यात येईल. हा विषय प्रत्येकी दोन श्रेयांकांचा असेल. बहुशाखीय विषयात आणि क्षमता विकास या घटकात मराठी विषयाचा समावेश करून तो ऐच्छिक स्वरूपातही सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करण्यात येईल. असे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी मराठी अभ्यास मंडळ आणि प्राध्यापक यांचे साहाय्य घेण्यात येईल.

५.१.३.९ महाविद्यालयांतील व विद्यापीठांतील अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकण्यासाठी उत्तेजन दिले जाईल आणि त्यासाठी अध्यापनाची सोय केली जाईल.

५.१.३.१० मराठी संस्कृतीचा परिचय करून देणारा अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी भाषांमधून उपलब्ध करून देण्यात येईल आणि ऑनलाईन पद्धतीने चाचणी घेऊन प्रमाणपत्र दिले जाईल.

५.१.३.११ मराठी ज्ञानभाषा होण्याच्या दृष्टीने राज्यातील महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांच्यातर्फे आयोजित चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा, परिसंवाद आदि उपक्रमात, मराठी भाषेचाही वापर केला जावा, यासाठी महाविद्यालये व विद्यापीठे यांना निदेश दिले जातील.

५.१.३.१२ महाराष्ट्र राज्यातील विविध महाविद्यालयांतील तसेच विद्यापीठांतील मराठी विभागातील रिक्त पदे भरण्यात येतील आणि शासनाच्या संमतीशिवाय कोणत्याही महाविद्यालयातील व विद्यापीठातील मराठी भाषा विभाग तसेच मराठी नाट्य-चित्र प्रशिक्षण व लोककला विभाग बंद करण्यात येणार नाही.

५.१.३.१३ विद्यापीठीय व्यवहारात मराठी भाषेचा समुचित वापर होण्याच्या दृष्टीने कृषि  आणि कृषितर विद्यापीठांसाठी स्थायी स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना दिल्या जातील व भाषा परीक्षणाचा हा एक भाग असेल.

५.१.३.१४ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, तंत्रशिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्यातर्फे देवनागरी मुद्राक्षर तंत्रज्ञान व त्याचे उपयोजन यासंबंधातील पाठ्यक्रमांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश केला जाईल.

५.१.३.१५ महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय पातळीवर मराठी साहित्याच्या इतिहासाप्रमाणेच मराठी भाषेच्या इतिहासाचे अध्यापन केले जाईल.

५.१.३.१६ मुलांच्या भाषिक विकासातील बालसाहित्याचे स्थान व महत्त्व लक्षात घेऊन "बालसाहित्य" या साहित्यप्रकाराकडे स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून पाहिले जाईल आणि उच्च शिक्षण व विद्यापीठीय स्तरावर "मराठी बालसाहित्य" या विषयाचा स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून समावेश करण्यात येईल. बालसाहित्याचे सर्वांगीण संशोधन व तौलनिक अभ्यास यांचा अंतर्भाव त्यात केला जाईल.

५.१.३.१७ उच्च शिक्षणातील मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन केवळ साहित्यलक्ष्यी व पारंपरिक पाठ्यक्रमापुरते सीमित न ठेवता ते व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख व कौशल्याभिमुख केले जाईल. त्यासाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठीतून टंकलेखन, लघुलेखन, मुद्रितशोधन, पुस्तकनिर्मिती, जाहिरात लेखन, भेटकार्डासाठी कॅलिओग्राफी, मराठी चित्रपट-नाटक लेखन, पटकथा, संवाद लेखन, डबिंग, सबटायटल्स आणि विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन आदि भाषा-साहित्य संबंधित अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातील.

५.१.३.१८ एम. फिल. व पीएच.डी.चे प्रबंध मराठीमधून सादर करताना ते एकसंकेत (युनिकोड) प्रणालीतून सादर करणे अनिवार्य केले जाईल. तसेच या संबंधातील संशोधनचौर्य तपासण्यासाठी विशिष्ट प्रणाली शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत विकसित करण्यात येईल.

५.१.३.१९ महाराष्ट्रातील सर्व अमराठी भाषिकांसाठी व्यावहारिक मराठीचा अल्प मुदतीचा अभ्यासक्रम इंग्रजी व हिंदीमध्ये बनवून तो ऑनलाईन पद्धतीने शिकवला जाईल व चाचणी परीक्षा घेऊन त्यांना प्रमाणपत्र दिले जाईल. त्यासाठी सर्व खाजगी उद्योगसमूह, संस्था आदिंमध्ये कार्यरत अमराठी कर्मचाऱ्यांना तो शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

५.१.३.२० पदव्युत्तर शिक्षणात विशेष ग्रंथकार या विषयासाठी वेगळी प्रश्नपत्रिका असते. त्यातील चार पाच पर्यायी नावांमध्ये स्थानिक बोलीतील एका साहित्यिकाचा अंतर्भाव करण्यात येईल.

## ५.२. नवतंत्रज्ञान आणि मराठीचा वापर

### ५.२.१ प्रस्थापित संस्थांचा विकास, संस्थांची निर्मिती व नवीन नेमणुका

५.२.१.१ माहिती तंत्रज्ञान विभाग आणि राज्य माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश हा वैश्विक स्तरावरील तंत्रज्ञानाच्या स्थानिकीकरणाचा म्हणजेच हे तंत्रज्ञान मराठी भाषेतून प्रभावीपणे वापरले जावे यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचा आहे. त्यानुसार सदर विभागांचे नामकरण अनुक्रमे "मराठी माहिती तंत्रज्ञान विभाग" व "राज्य मराठी माहिती तंत्रज्ञान संचालनालय" असे केले जाईल.

५.२.१.२ माहिती तंत्रज्ञान विभागात मराठी भाषेचे भाषिक अभियंते आणि भाषाशास्त्रज्ञ यांची नियुक्ती करण्यात येईल. भाषिक अभियंते आणि भाषाशास्त्रज्ञ यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासन निश्चित करील.

५.२.१.३ तंत्रज्ञानाच्या विविध शाखांतील व्यवहारात (आर्थिक क्षेत्रांसह) मराठीचा सर्वंकष वापर करण्याबाबत नियमन करणारी स्थायी यंत्रणा आणि आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतील.

५.२.१.४ महाराष्ट्रातील सर्व शैक्षणिक संस्था तसेच अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय शिखर शिक्षण संस्थांत (उदा. भारतीय प्राद्योगिकी संस्था, टाटा मूलभूत संशोधन संस्था इत्यादी) मराठी विभाग निर्माण व्हावेत यासाठी पाठपुरावा केला जाईल व त्यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाईल.

५.२.१.५ महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांची तसेच अधीनस्थ अनुदानित संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, शासन अंगीकृत उपक्रम, निमशासकीय संस्था यांची सर्वंकष संकेतस्थळे मराठीतून असणे अनिवार्य असेल.

## ५.२.२ संगणन साधने, उपयोजने, निर्मिती व विकसन

५.२.२.१ महाराष्ट्र राज्यात शासकीय खरेदी व शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणक कळफलकांवरील 'छापील अक्षर कळमुद्रा' रोमन लिपीबरोबरच मराठी देवनागरी लिपीत छापलेल्या/कोरलेल्या/उमटवलेल्या असणे अनिवार्य असेल. तसेच सदर कळफलक मांडणी भारतलिपीचीच असणे अनिवार्य असेल.

५.२.२.२ टंकलेखनासाठी प्रत्यक्षातील कळफलक तसेच आभासी (Virtual) कळफलक यांचे प्रमाणीकरण तसेच मराठी टंकांसंदर्भात (Fonts) टंकांतील अक्षराकारांचे विशेष, अक्षराकारांची (Glyph) संख्या इत्यादीबाबत प्रमाणके निश्चित केली जातील आणि सर्व क्षेत्रांत त्यांचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

५.२.२.३ शासकीय आणि निमशासकीय व्यवहारात संगणकावर मराठीतून काम करताना भारतलिपी कळफलकाचा (Inscript Keyboard) वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

५.२.२.४ वापरकर्त्याला संगणक, भ्रमणध्वनी, टॅबलेट इत्यादी संगणन साधनांत विनासायास मराठी मजकूर (प्रत्यक्ष/आभासी) कळफलकाद्वारे नोंदवता यावा यासाठी साधने विकसित केली जातील. तसेच तो मजकूर ध्वनीद्वारे [बोलीचे लेखी (Speech-to-Text) करून] नोंदवता यावा म्हणून यंत्रणा नियुक्त करून आवश्यक ती प्रमाणके व साधने (Tools) संशोधन करून विकसित केली जातील.

५.२.२.५ हस्ताक्षरातील, टंकलिखित, मुद्रित अशा विविध स्वरूपातील मराठी मजकूर ओळखून त्याचे संगणकीय मजकुरात रूपांतर करणारा दृश्य-अक्षर-वेचक (ओसीआर) आणि इतर उपयुक्त तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

५.२.२.६ महाराष्ट्र राज्यात वापरली जाणारी/विक्री होणारी वीजकीय (Electronic) उत्पादने (संगणक, भ्रमणध्वनी इत्यादी) यांमध्ये मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध असेल. संगणक, भ्रमणध्वनी, टॅबलेट इत्यादी संगणन साधनांचा संपूर्णपणे मराठीत वापर करता येईल, त्यासाठी कार्यकारी प्रणाली (Operating System), संगणकीय प्रणाली (Softwares), इतर प्रणाली यात मराठीतून कार्यसूची, साहाय्य सूचना दिसणे यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

५.२.२.७ मराठी भाषा संगणकस्नेही करण्यासाठी साहाय्यक संगणकीय साधने उदा. लेखनशोधक, व्याकरण तपासनीस, स्वयं दुरुस्ती प्रणाली (Auto Correct), पठणप्रणाली (Text-to-Voice), समानार्थी शब्द सुविधा यांची, संशोधन करून निर्मिती केली जाईल. शासनाने मान्य केलेले अपवाद वगळून सर्व तंत्रज्ञान/प्रमाणके मुक्त स्वरूपात खुली असतील. प्रतिमुद्राधिकार, निजस्व आणि व्यावसायिक मुद्रा यांपासून ते मुक्त असतील.

५.२.२.८ विविध नवीन संगणकीय प्रणालींची मराठीतून निर्मिती व अस्तित्वातील संगणक प्रणालींचे मराठीत रूपांतरण करण्याच्या दृष्टीने भाषांतराची/रूपांतराची भाषिक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली जातील.

५.२.२.९ संगणक वापराच्या व संशोधनाच्या दृष्टीने मराठी सक्षम करण्यासाठी संगणकीय मराठी भाषेतील शब्दांचा, वाक्यांचा आणि नमुने व प्रारूपे यांचा संचय तयार केला जाईल.

५.२.२.१० राज्यात दरवर्षी एकसंकेत (युनिकोड) टंकनिर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात येईल.

५.२.२.११ महाराष्ट्रात सर्वत्र ए.टी.एम., विमानतळ, रेल्वे स्थानक व अन्य सार्वजनिक सुविधा केंद्रात लोकांच्या सोयीसाठी असणारा संवाद पटल (युजर्स इंटरफेस) मराठीमधूनही उपलब्ध असावा यासाठी प्रयत्न केले जातील.

५.२.२.१२ विविध खाजगी आस्थापनांच्या मराठी प्रणालींमधील टंक, एकसंकेतामध्ये (युनिकोडमध्ये) रूपांतरित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

५.२.२.१३ महाराष्ट्र शासनातर्फे अधिकृत मराठी विदा केंद्र (डेटा सेंटर) उभारण्यात येईल आणि त्याद्वारे मराठी पुस्तके, वृत्तपत्रे, नियतकालिके, हस्तलिखिते, नाटक, चित्रपट, दृकश्राव्य व्याख्याने/ मुलाखती, दूरदर्शन व इतर मराठी चित्रवाणींचे संग्राह्य कार्यक्रम अशा विविध मराठीच्या साहित्यिक, सांस्कृतिक व कलाविषयक ज्ञान- माहिती व अन्य बाबींचा संग्रह केला जाईल व तो सर्वांसाठी उपलब्ध करून दिला जाईल.

५.२.२.१४ मराठी भाषेच्या विविध काठिण्य पातळीच्या प्रमाणपत्र परीक्षा घेऊन अधिस्वीकृती (Accreditation) देण्याची यंत्रणा उभारण्यात येईल.

### <u>५.२.३ संगणकीय शिक्षण</u>

वर्णमाला व लिपी यांचे चलनवलन शिकवताना भारतलिपी कळफलकाचा (Inscript Keyboard) आधार घेतला जाईल.

५.२.३.१ इयत्ता पाचवीच्या वर्गापासून शालेय शिक्षणात माहिती तंत्रज्ञान विषयाचा अंतर्भाव केला जाईल व सर्व विद्यार्थ्यांना महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित यांचा MS-CIT किंवा समपातळीचा अभ्यासक्रम शिकविला जाईल. इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्याच्या पुढील टप्प्याचा माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रम शिकविला जाईल. महाविद्यालयीन सर्व शाखांच्या पदवी शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सारखे अत्याधुनिक विषय शिकविण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल.

५.२.३.२ त्यासाठी आयटी कंपन्यांना सहभागी करून घेतले जाईल. याप्रमाणे अवघा महाराष्ट्र विशिष्ट कालावधीत मराठीतून केवळ संगणक साक्षर नव्हे तर संगणक निपुण केला जाण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमून धोरण अभ्यासक्रम व कृती कार्यक्रम आखला जाईल आणि त्याची पुढील पाच वर्षांत अंमलबजावणी केली जाईल.

५.२.३.३ माहिती तंत्रज्ञान विषयीच्या सर्व स्तरांवरील अभ्यासक्रमांत मराठी भाषेच्या वापराच्या तंत्रज्ञानाचा घटक समाविष्ट करण्यात येईल.

## ५.३ बोली भाषांचे जतन, संशोधन आणि दस्तावेजीकरण

### भूमिका

मराठीमध्ये "दर दहा कोसावर भाषा बदलते" अशी एक सार्थ म्हण आहे. महाराष्ट्रात आजमितीस सुमारे ९२ बोलीभाषा बोलल्या जातात, त्यातील ५० मराठीशी मिळत्या जुळत्या आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात अत्यंत समृद्ध अशा बोलीभाषा आहेत. उदा. मालवणी, खान्देशी,

उदगिरी, वऱ्हाडी , अहिराणी, डांगी, तंजावरी, तावडी, झाडीबोली, आगरी, गोंडी, कोरकू आदि बोली भाषा आणि सर्व महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या पारधी, बंजारा समाजाच्या भाषा या खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे अभिमानास्पद वैभव आहे. या भाषा जतन करणे आणि त्याचे दस्तावेजीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण महाराष्ट्रातील विविध समाजाच्या संपन्न कृषि व वन निगडित संस्कृतीच्या त्या वाहक आहेत. या भाषांची शब्दसंपदा, म्हणी व वाक्प्रचार, लोकगीते आणि बोलण्याचा वैशिष्ट्यपूर्ण लहेजा म्हणजे बोलण्याची ढब-एकूणच या सर्व बोलीभाषांचा अभ्यास व संशोधन करणे व त्यांच्या भाषेचे शब्दकोश, लोकगीतांचे संकलन आणि त्यांचे बोलणे, नृत्य आणि पारंपरिक ज्ञानाचा शोध घेऊन जतन करणे आणि याचे दस्तावेजीकरण करणे हा मराठी भाषा धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

५.३.१ मराठीच्या सर्व बोलींची नोंद, संकलन, सखोल अभ्यास व संशोधन केले जाईल. महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये त्या त्या प्रदेशातील बोलींचे संशोधन व अभ्यास करण्यात येईल.

५.३.२ सर्व भटक्या, विमुक्त जाती-जमाती आणि आदिवासी जमातींच्या संस्कृतींचा, साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास केला जाईल.

५.३.३ महाराष्ट्रातील कृषि कारागीर तसेच विविध क्षेत्र निगडित 'जनबोली'चे संशोधन प्रकल्प राबवून त्यांचे शब्दकोश तयार करण्यात येतील.

५.३.४ महाराष्ट्रातील सर्व कृषीतर विद्यापीठांना बोलीभाषांबाबतचे सर्व प्रकारचे दस्तावेजीकरण करण्यासाठी विशेष अनुदान दिले जाईल व तज्ज्ञ बोलीभाषा प्राध्यापक व अभ्यासकांकडून त्यांची लोकगीते, नृत्ये, जीवनपद्धती, जन्म,विवाह ते मृत्यू पर्यंतचे सोहळे व परंपरागत विधी, त्यांच्या बोलण्याचे नमुने आदि सर्व जीवन, भाषा आणि संस्कृतीच्या सर्व अंग-उपांगाचे दृकश्राव्य पद्धतीने दस्तावेजीकरण केले जाईल.

५.३.५ महाराष्ट्राच्या नागरी समाजास या बोलीभाषेची संपन्नता व जीवनपद्धतीचे दर्शन व्हावे म्हणून मराठी भाषा विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग आणि पर्यटन विभागाच्या सहकार्याने विविध कार्यक्रमात बोलीभाषेतील गीत-नृत्य कलेचे कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातील, त्यावेळी दृकश्राव्य सादरीकरण देखील करण्याची व्यवस्था केली जाईल. त्यांची पारंपरिक (इथनिक) वस्त्रप्रावरणे, दागिने आणि हस्तकला वस्तुंची प्रदर्शनवजा विक्रीकेंद्रे जिल्ह्याजिल्ह्यात बचतगटामार्फत सुरू करण्यात येतील.

५.३.६ अखिल भारतीय साहित्य महामंडळ व साहित्य परिषदेमार्फत एकेका बोलीची साहित्य संमेलने आयोजित केली जातील आणि या भाषेत साहित्य निर्मितीला उत्तेजन दिले जाईल व पूर्ण बोलीभाषेतील कविता, कथा, कादंबऱ्या व इतर ललितेतर साहित्याची पुस्तके छापण्यासाठी प्रकाशकांना खास योजना बनवून आर्थिक साहाय्य केले जाईल.

५.३.७ आदिवासी विभागाच्या मदतीने संपूर्ण किंवा बऱ्याच अंशी बोलीभाषेतील व ती बोली बोलणाऱ्या लोकांच्या जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या चित्रपट व नाट्यनिर्मितीस आर्थिक मदतीची योजना तयार करण्यात येईल आणि अशा चित्रपटांना मराठी चित्रपट पुरस्काराप्रमाणे शासन पुरस्कार दिले जातील.

५.३.८ उत्कृष्ट वाड्मय पुरस्कारात प्रौढ विभाग व बाल विभाग असे विभाजन केलेले असते. त्यात "बोली विभाग" हा तिसरा विभाग घेऊन त्यात बोली भाषेतील सर्व साहित्यप्रकारांचा अंतर्भाव करण्यात येईल.

## ५.४ लिपी शिक्षण

### भूमिका

आपली भाषा जर आपला आवाज असेल तर, आपली लिपी हा आपला चेहरा आहे. ह्या अर्थाने देवनागरी लिपी ही मराठी समाजाची दृश्यात्मक ओळख आहे असे म्हणता येईल. उच्चारित भाषेला अक्षर करण्याचे काम लिपीमुळेच शक्य होते. तिचे व्यावहारिक महत्त्व कितीही असले तरी भाषेला दृश्यरूप देण्याचे एक साधन म्हणून तिला दुय्यम स्थान दिले जाते. तिला स्वत:ची अशी एक ओळख, परंपरा आहे आणि ती भाषिक परंपरेचाच एक अविभाज्य व महत्त्वाचा भाग आहे हे सहसा लक्षात घेतले जात नाही.

तसेच कोणतीही भाषा टिकण्याचे, वाढण्याचे मर्म तिच्या लिखित, छापील अक्षरांत आहे, हे आपण अमान्य करू शकत नाही. म्हणूनच भविष्यात जर आपल्याला आपली मराठी भाषा टिकवावयाची असेल तर आपल्याला देवनागरीत हस्ताक्षर, सुलेखन, मुद्राक्षरण व संगणकीय पटलावरील अक्षरमुद्रा या माध्यमांतून आपली मराठी भाषा सातत्याने नवीन पिढीसमोर मांडावी लागेल. तसेच आजच्या काळात आपल्याला लिपीचा दृश्यदर्जा आंतरराष्ट्रीय पातळीचा राखावा लागेल. त्यासाठी योग्य ती व्यवस्था निर्माण करावी लागेल.

५.४.१ समग्र देवनागरी अक्षर कोशांमध्ये देवनागरीचे हस्ताक्षर वळण, सुलेखन व मुद्राक्षराचे प्रमाण उदाहरणार्थ मात्राजोडणी, जोडाक्षर आकाररचना आणि सर्व अक्षराकार यांचा अंतर्भाव असेल.

५.४.२ महाराष्ट्रातील लिपी, सुलेखन आणि मुद्राक्षर यांच्या अभ्यासासाठी अभ्यास परिषदा, प्रदर्शने व कार्यशाळा असे उपक्रम वेळोवेळी शासन आयोजित करील. असे उपक्रम राबवणाऱ्या इतर संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल.

५.४.३ देवनागरी सुलेखन परिचय/सराव पुस्तिका, महत्त्वाच्या मराठी सुलेखकांच्या कामाच्या माहितीसह तयार केली जाईल व ती शालेय स्तरावर चित्रकला परीक्षेसाठी क्रमिक पुस्तक म्हणून उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कला संचालनालयाकडे सोपवण्यात येईल.

५.४.४ महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांना मोडी लिपी शिकवण्यासाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम तयार करून ती इच्छुकांना शिकविण्यासाठी मदत व उत्तेजन दिले जाईल. ज्या शासकीय विभागात जुनी मोडी भाषेतले अभिलेख मोठ्या प्रमाणात आहेत, त्या विभागाच्या कार्यरत कर्मचाऱ्यांनी मोडी भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केला तर त्यांना विशिष्ट रकमेचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल.

## ५.५ मराठी विद्यापीठ

महाराष्ट्र शासनामार्फत नजीकच्या भविष्यात स्वतंत्र मराठी विद्यापीठ स्थापन केले जाईल. त्याचे स्वरूप व ध्येयधोरणे निश्चित करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमून तसेच तामिळ, मल्याळम व कन्नड भाषेच्या कार्यरत भाषिक विद्यापीठांचा उद्देश (vision आणि mission statement सह), अभ्यासक्रम, संशोधन आदिंचा व आजवर झालेल्या फलश्रुतीचा अभ्यास करून मराठी विद्यापीठाचा उद्देश, अभ्यासक्रम आणि इतर बाबींची निश्चिती केली जाईल. हे विद्यापीठ संशोधन व उपयोजित मराठीचे विद्यापीठ असेल. मराठी ही ज्ञानाची व रोजगाराची भाषा होण्यासाठी हे विद्यापीठ काम करील. सध्या जे विज्ञान, तंत्रज्ञान व अन्य आधुनिक ज्ञानशाखांचे उच्च शिक्षण इंग्रजीत दिले जाते, त्याला मराठीचा पर्याय पुढील काळात ऐच्छिक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी या विषयांची पाठ्यपुस्तके व संदर्भ ग्रंथ मराठीत निर्माण केले जातील. जगातील विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आदि विविध ज्ञानशाखांच्या संदर्भ व संशोधनपर ग्रंथांचे मराठीत अनुवाद करणे, बोलीभाषा व लोककला-लोकसाहित्याचे संशोधन, जतन व संवर्धन, कोश निर्मिती, आंतरजालात मराठीचा प्रभाव वाढवणे आदि उद्दिष्टपूर्तीसाठी मराठी विद्यापीठाची मुक्त व लवचिक रचना करण्यात येईल.

प्रस्तावित मराठी विद्यापीठ हे प्रामुख्याने संशोधन व कार्यक्रम निगडित असेल. महाराष्ट्रातील सर्व राज्य विद्यापीठे अकृषिक/सर्वसाधारण, कृषि, आरोग्य व पशु वैद्यकीय ,तंत्र शिक्षण आणि मुक्त विद्यापीठ, तसेच सहमतीने खाजगी व अभिमत विद्यापीठे, डेक्कन इन्स्टिट्यूट, गोखले इन्स्टिट्यूट, पुणे अशा शिक्षण व संशोधनातील अग्रगण्य संस्थांमध्ये उपकेंद्रे असावीत. त्या मागचा उद्देश त्यांचे अभ्यास व संशोधनाचे ज्ञान मराठीत आणता येईल. त्यासाठी एका नामांकित कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञांची सल्लागार समिती नेमण्यात यावी. संलग्न विद्यापीठातून प्राध्यापक प्रतिनियुक्तीवर घेण्याचे प्रावधान केले जाईल.

“मराठी विद्यापीठाची कार्यपद्धती आणि रचना ही पारंपरिक किंवा खासगी विद्यापीठासारखी नसावी. तिची कार्यपद्धती मुक्त आणि लवचिक असावी. हे विद्यापीठ केवळ साहित्यकेंद्री नसावे. संशोधन, अनुवाद, रोजगारनिर्मिती, मराठीला ज्ञानभाषा बनविणे, लोककला आणि लोकसंस्कृती यांचे जतन आणि महाराष्ट्र संस्कृतीचे भरणपोषण यासाठी वाहिलेले हे विद्यापीठ असेल.

सदरच्या विद्यापीठात पुढीलप्रमाणे संकुल (स्कूल) असावेत. १) मराठी भाषाभ्यास २) कला व संस्कृती संकुल ३) अनुवाद संकुल ४) ज्ञानभाषा निर्मिती संकुल ५) संशोधन आणि प्रशिक्षण संकुल ६) माहिती आणि तंत्रज्ञान अभ्यास आणि उपयोजन संकुल ७) उपयोजित आणि विस्तार सेवा संकुल

मराठी विद्यापीठ हा प्रस्तावित मराठी भाषा धोरणाचा एक सर्वाधिक महत्त्वाचा भाग असल्यामुळे विद्यापीठाची रचना, तिचे उद्देश, संकुल निर्मिती, प्रशासकीय रचना, विद्यापीठाचा कायदा, तिचे मुख्यालय, उपकेंद्रे, कॉर्पोरेट कार्यालय आदि बाबी ठरवून एक प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल आणि त्या आधारे विद्यापीठ कायदा संमत केला जाईल.

मराठी विद्यापीठ हे मराठी भाषा धोरणाचे सर्वाधिक महत्त्वाचे आणि राज्य शासनाच्या मराठीबाबतच्या प्राथम्याचे आणि प्राधान्यक्रमाचे असल्यामुळे त्यासाठी पुरेसा निधी देण्यात येईल आणि पाच वर्षात विद्यापीठ पायाभूत सुविधांसह पूर्णपणे विकसित करण्यात येईल.

## ५.६ विधि व न्यायव्यवहार

५.६.१ दि. २१ जुलै, १९९८ च्या अधिसूचनेप्रमाणे तालुका व जिल्हा न्यायालयांच्या कामकाजाची भाषा मराठी आहे आणि त्यानुसार न्यायालयांमधील मराठीतील कामकाज निरपवादपणे आणि अधिक गतिमानतेने होण्यासाठी शासन, मुंबई उच्च न्यायालयाच्या मदतीने तालुका व जिल्हा न्यायालयांना सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देईल. तसेच उच्च न्यायालयाला कुशल मनुष्यबळ (उदा. मराठी लघुलेखक इत्यादी) पुरवण्याचे काम शासन करील.

५.६.२ संविधानाच्या अनुच्छेद ३४८ (२) मधील स्पष्ट तरतुदीप्रमाणे मराठी भाषेला मुंबई उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा देण्याविषयी मा. राष्ट्रपती महोदयांची पूर्वपरवानगी घेण्यासाठी मा. राज्यपाल महोदयांचा प्रस्ताव महाराष्ट्र शासन, केंद्र सरकारकडे तातडीने पाठवील. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अनुसार महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठीला मुंबई उच्च न्यायालयात 'प्राधिकृत भाषेचा' दर्जा मिळण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनाकडे सर्वतोपरी प्रयत्न व पाठपुरावा करील.

५.६.३ मराठी भाषा न्यायव्यवहाराची भाषा म्हणून विकसित करण्यासाठी विधि संकल्पना व परिभाषा कोश तयार करण्यात येईल. सदर कोश शोधानुकूल (Searchable) एकसंकेत (युनिकोड) पद्धतीने महाजालावर उपलब्ध करून देण्यात येईल.

तसेच विधिविषयक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम मराठीतून उपलब्ध करण्याकरिता विद्यापीठांच्या साहाय्याने अभ्यासक्रमाची आखणी करण्यात येईल.

५.६.४ महाराष्ट्रातील सर्व न्यायालये आणि न्यायिक प्राधिकरणे, धर्मादाय आयुक्त, सहकार निबंधक, ग्राहक मंच इत्यादी कार्यालयांतील व्यवहार मराठी भाषेतून करणे बंधनकारक असेल.

५.६.५ विधि अभ्यासक्रमात इंग्रजीबरोबरच मराठी भाषेचे माध्यम उपलब्ध करून देण्यात येईल व त्यासाठी मराठीत पुस्तके निर्माण करण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात येईल. दरम्यान विधि अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका मराठीतून उपलब्ध केल्या जातील आणि त्यांची उत्तरे मराठीतून लिहिण्याचा ऐच्छिक पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जाईल.

५.६.६ मराठीतून केंद्रीय अधिनियमांचे प्राधिकृत पाठ लवकरात लवकर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने केंद्रीय अधिनियमांच्या मराठी अनुवादाला मा. राष्ट्रपतींची मान्यता घेण्याऐवजी मा.राज्यपालांची मान्यता घेण्याची तरतूद करण्यासाठी प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ मध्ये सुधारणा करण्याबाबतचे प्रयत्न राज्य शासन केंद्र सरकारकडे करील.

५.६.७ राज्याच्या अखत्यारीत येणाऱ्या विषयांच्या संदर्भातील कायद्यांची मूळ विधेयके प्रथम मराठीतून तयार करण्यासाठी विधि व न्याय विभागात मराठी प्रारूपकारांची पदे निर्माण करून ती तातडीने भरण्यात येतील आणि उपलब्ध प्रारूपकारांना मराठीतून विधेयक तयार करण्यासाठी प्रशिक्षित करण्यात येईल.

५.६.८ कायद्याच्या अभ्यासक्रमामध्ये 'कायद्याची प्रारूप निर्मिती' या विषयाचा समावेश करण्यात येईल. मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषामाध्यमातून प्रारूप/मसुदा निर्मितीचे शिक्षण देण्यात येईल.

५.६.९ राज्यातील कनिष्ठ न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची पदे भरण्यासाठी राज्य शासनाच्या विधि व न्याय विभागामार्फत या पदांसाठी शैक्षणिक व अन्य पात्रता तसेच परीक्षा यासंबंधी दि. २१ ऑगस्ट २००८ च्या अधिसूचनेमध्ये जे नियम आहेत त्यात सुधारणा करून, सदर परीक्षांसाठी १०० गुणांची मराठी भाषा विषयाची परीक्षा अनिवार्य करण्यात येईल.

५.६.१० राज्याचा महा अधिवक्ता व सरकारी वकील यांची नियुक्ती करताना अशा व्यक्तींना मराठी लिहिता, वाचता आणि बोलता येते याची खातरजमा केली जाईल.

५.६.११ सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयांचा यथार्थ मराठी अनुवाद करून तो नियतकालिक स्वरूपात उपलब्ध करून देणाऱ्या खाजगी प्रकाशनांना आर्थिक मदत करण्यात येईल.

५.६.१२ न्यायालयांमध्ये मराठी भाषेतून कामकाज सुरळीतपणे होण्यासाठी मराठी लघुलेखक, मराठी टंकलेखक, अनुवादक व मुद्रितशोधक यांची पदे भरण्यात येतील व न्यायालयीन सेवेत असलेले इंग्रजी लघुलेखक व टंकलेखक यांना मराठी लघुलेखन व टंकलेखनाचे प्रशिक्षण देण्यात येईल.

५.६.१३ न्यायालयांच्या दैनंदिन कामकाजात लागणारे नमुने तसेच विविध दस्तऐवज, अर्ज, आवेदनपत्रे इत्यादींचे प्रमाणनमुने पुस्तकरूपात तालुका व जिल्हा स्तरावर मराठी भाषेत उपलब्ध करून दिले जातील. हे नमुने न्यायालयांच्या संकेतस्थळावरूनही उपलब्ध करून दिले जातील.

५.६.१४ न्यायिक सेवेत असलेल्या न्यायाधीशांना न्यायनिर्णय व आदेश मराठीतून देता यावेत यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात येईल.

५.६.१५ तालुका व जिल्हा स्तरावरील सर्व प्रकारच्या न्यायालयांमधील व न्यायाधिकरणांतील न्यायाधीशांना मराठी भाषेतून न्यायनिर्णय व आदेश देण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. त्यासाठी मुंबई उच्च न्यायालय व महाराष्ट्र गोवा वकील परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात येतील.

५.६.१६ महाराष्ट्र व गोवा राज्य तसेच दादरा, नगरहवेली व दीव या केंद्रशासित प्रदेशांसाठी "High Court of Judicature at Bombay" या नावाने उच्च न्यायालय कार्यरत आहे. या उच्च न्यायालयाचा उल्लेख मुंबई उच्च न्यायालय असा होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न चालू आहेत. मात्र या उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात प्रामुख्याने महाराष्ट्र व गोवा राज्याचे नागरिक येत असल्याने या उच्च न्यायालयाचे नामकरण महाराष्ट्र व गोवा उच्च न्यायालय असे होण्यासाठी शासन प्रयत्न करील.

५.६.१७ राज्य शासनाने दुय्यम न्यायालयांच्या कामकाजांची भाषा मराठी करण्यासाठी दि. २१ जुलै १९९८ रोजी काढलेल्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी मुंबई उच्च न्यायालय अंतर्गत अंमलबजावणी समिती स्थापन केली होती. तिच्या पुनरुज्जीवनाची शिफारस मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे करण्यात येईल.

५.६.१८ संगणक वापराच्या व संशोधनाच्या दृष्टीने मराठी सक्षम करण्यासाठी संगणकीय मराठी भाषेच्या शब्दांचा, वाक्यांचा आणि नमुने व प्रारूपे यांचा संचय तयार केला जाईल.

## ५.७ प्रशासनात मराठी भाषेचा वापर

५.७.१ महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अनुसार मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे. सदर अधिनियमानुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कार्यालयांतील मूळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश मराठीतच असतील व कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे व संकेतस्थळे मराठीत असतील.

वर्जित प्रयोजनांचा कालबद्ध आढावा घेऊन त्यांची संख्या किमान करण्याचा प्रयत्न केला जाईल.

५.७.२ सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील मंडळे, महामंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींच्या कार्यनियमावलीत मराठी भाषा धोरणातील सर्व शिफारशी आणि सूचना लागू राहतील. या तरतुदींचा समावेश करावा असे निदेश त्यांना दिले जातील व त्यानुसार कार्यवाहीचा आग्रह धरला जाईल.

५.७.३ मराठी भाषा धोरणाच्या जिल्हा स्तरावरील अंमलबजावणीचे काम जिल्हास्तरीय मराठी भाषा समितीकडे सोपवण्यात येईल.

५.७.४ शासकीय सेवेत प्रवेश करताना महाराष्ट्र लोकसेवा आयोग/निवड मंडळ इत्यादींमार्फत घेण्यात येणाऱ्या सेवाप्रवेश परीक्षेत सर्व पदांकरिता मराठी हा विषय अनिवार्य असेल.

५.७.५ महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० मधील 'एकसंकेताचा (युनिकोड) अधिकृत वापर' या मुद्यानुसार, शासकीय व निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था (शहरी व ग्रामीण) तसेच महामंडळे, मंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या, अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे इत्यादींना संगणकावर मराठीच्या वापरासाठी एकसंकेताचा (युनिकोडचा) वापर करणे बंधनकारक असेल.

५.७.६ शासकीय वापरातील पारिभाषिक शब्दांचा वापर सुलभ करून व त्यांचे अद्ययावतीकरण करून ते मुद्रित स्वरूपात व शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जातील. यामधून विकसित होणाऱ्या परिभाषेचा शासकीय कामकाजात वापर होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

५.७.७ शासकीय कामकाजात मराठीचा वापर टाळणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात तशी प्रतिकूल नोंद करून योग्य ती शिस्तभंगविषयक कारवाई केली जाईल.

५.७.८ प्रशासनात बाह्यस्रोतांमार्फत घेण्यात येणाऱ्या सेवा मराठीतून मागवण्यात येतील. तदनुषंगिक सर्व कामकाज मराठीतून करण्याबाबत बाह्यस्रोतांना बंधनकारक केले जाईल. उदा. मूळ प्रस्ताव, संगणकप्रणाली, चौकशी अहवाल, प्रकल्प अहवाल, सर्वेक्षण अहवाल इत्यादी.

५.७.९ शासकीय आणि निमशासकीय आस्थापनांची तसेच महामंडळे, मंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या यांची शासनाने (मंत्रिमंडळाने) निश्चित केलेली मराठी नावेच आस्थापनांच्या कामकाजात वापरली जातील. नवीन नावे निश्चित करताना मराठीतील एकच नाव निश्चित केले जाईल. त्याचे इंग्रजीत भाषांतर न करता रोमन लिपीत केवळ लिप्यंतर करण्यात येईल. ज्या आस्थापनांना द्विभाषिक नावे आहेत त्यांचा कारभार यापुढे मराठी नावाने होईल.

५.७.१० शासकीय व निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, महामंडळे, मंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या, कटक मंडळे (Cantonment Board) इत्यादींच्या कार्यालयांतून सर्वसामान्य जनतेशी संबंधित (उदा. प्रादेशिक परिवहन कार्यालय, शिधावाटप, पोलीस, महसूल इत्यादी कार्यालयांचे) विविध परवाने, सूचनाफलक, नामफलक, अर्ज नमुने इत्यादी मराठीतूनच असतील. हे नमुने भाषा संचालनालयाकडून प्रमाणित करून घेणे अनिवार्य असेल.

५.७.११ केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये तसेच सर्व बँका इत्यादींमध्ये दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिकाऱ्यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य असेल.

५.७.१२ राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, विनाअनुदानित शासन मान्यताप्राप्त शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांची कार्यालये तसेच राज्यातील केंद्र सरकारच्या सर्व कार्यालयांच्या आस्थापनांची शीर्षपत्रे, सूचना, ओळखपत्रे तसेच सर्व लेखनसामग्रीतील कागदपत्रांवर "मराठी पत्रव्यवहाराचे स्वागत आहे. मराठीतून पत्रव्यवहार करावा" अशी तळटीप देण्यात येईल. तसेच संकेतस्थळ व प्रसारसामग्रीत देखील याचा उल्लेख असेल.

५.७.१३ केंद्र सरकारच्या कार्यालयांतील राज्याबाहेर बदली न होणाऱ्या पदांसाठी सेवाप्रवेश परीक्षा व मुलाखती मराठी भाषेतून देण्याची व घेण्याची व्यवस्था केंद्र सरकारद्वारे केली जाईल, यासाठी आवश्यक तो पाठपुरावा केंद्र सरकारकडे केला जाईल.

५.७.१४ त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील केंद्र सरकारच्या आस्थापनांमध्ये उदा. राष्ट्रीयीकृत बँका, आयकर विभाग इत्यादींमध्ये राजभाषेचा काटेकोरपणे वापर होईल. यासाठी आवश्यक ते निदेश दिले जातील आणि कार्यालयांमध्ये अमराठी भाषिक अधिकारी/कर्मचारी यांना मराठी भाषेचे प्रशिक्षण दिले जाईल व मराठी भाषेतून संगणक प्रणाली तयार करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येईल.

५.७.१५ राज्यातील केंद्र सरकारच्या कार्यालयांतील अमराठी भाषिक अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे प्रशासन योग्य प्रमाणात व्हावे म्हणून मराठी भाषेचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात येईल.

५.७.१६ प्रशासनात मराठी वापरासाठी मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्याकरिता शासनाकडून यंत्रणा उभारण्यात येईल. ही यंत्रणा राज्यातील विद्यापीठांच्या कार्यकक्षेनुसार उभारली जाईल.

५.७.१७ यशदासह सर्व शासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये मराठी भाषेतून इंग्रजीसह प्रशिक्षण देण्यासाठी मार्गदर्शक सूचना बनविण्यात येतील.

५.७.१८ संगणक वापराच्या व संशोधनाच्या दृष्टीने मराठी सक्षम करण्यासाठी संगणकीय मराठी भाषेच्या शब्दांचा, वाक्यांचा आणि नमुने व प्रारूपे यांचा संचय तयार केला जाईल.

५.७.१९ शासन अंगीकृत उपक्रमातील उद्योगांकडून माध्यमांना दिल्या जाणाऱ्या जाहिरातींमध्ये (उदा. उत्पादनांच्या, नोकरभरतीच्या, टाकाऊ मालाची विक्री इत्यादी बाबतच्या जाहिराती) मराठी भाषेचा वापर अनिवार्य असेल.

५.७.२० गृहनिर्माण, म्हाडा, सिडको, एमआयडीसी, एमपीसीबी, एमएसईबीच्या तीनही कंपन्या इत्यादींकडून केल्या जाणाऱ्या दस्तऐवजासह सर्व व्यवहार मराठी भाषेत प्राधान्याने होईल यासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातील व त्याबाबत वार्षिक अंकेक्षण करण्यात येईल.

५.७.२१ दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयांमध्ये खाजगी गृहनिर्माण विकासकांनी ग्राहकांशी केलेले करारमदार आदि दस्तऐवजांची मराठी किंवा मराठी-इंग्रजी अशा द्वैभाषिक स्वरूपात नोंदणी केली जाईल.

## <u>५.८ वित्त व उद्योगजगत</u>

५.८.१ उत्पादकांनी त्यांच्या उत्पादनांची छापनावे (Brand Name) मराठीतून द्यावीत यासाठी उद्योजकांचे, व्यावसायिकांचे तसेच ग्राहकांचे मराठी भाषा वापरासंबंधी प्रबोधन करण्यात येईल. तसेच असा वापर करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन दिले जाईल.

५.८.२ वेगवेगळ्या उद्योगांनी आपल्या उत्पन्नाचा काही भाग सामाजिक जबाबदारी निधी (सीएसआर) म्हणून खर्च करावा अशी तरतूद आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी उद्योगांनी केलेला खर्च हा सामाजिक जबाबदारी निधी (सीएसआर ) साठी ग्राह्य धरला जाईल.

५.८.३ महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रात मराठी कामगार विपुल प्रमाणात असतात याची दखल घेऊन तेथील सर्व (प्रशिक्षण, पत्रव्यवहार, गृहपत्रिका, सूचना फलकावरील मजकूर, कर्मचाऱ्यांचा वार्षिक अहवाल, हजेरीपत्रके इत्यादी) व्यवहार मराठी भाषेतूनच केले जावेत असे निदेश दिले जातील.

५.८.४ वित्त संस्था, उद्योगधंदे, खाजगी कंपन्या, स्वयंसेवी संस्था इत्यादींसह ज्या ज्या व्यक्तींना मराठी भाषेच्या संबंधात मार्गदर्शनाची गरज भासेल त्यांच्यासाठी मराठी मार्गदर्शन केंद्र चालवले जाईल. जिल्हा पातळीवरही ही केंद्रे असतील.

मराठीच्या वापराबाबत तक्रार निवारण केंद्र स्थापन केले जाईल.

५.८.५ महाराष्ट्र राज्यातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीयीकृत व आंतरराज्यीय अधिकोषांचे (बँका) व वित्त संस्थांचे सर्व कामकाज त्रिभाषा सूत्रानुसार प्राधान्याने मराठी भाषेमधून करणे बंधनकारक असेल. महाराष्ट्रातील सहकारी अधिकोष, पतपेढ्या यांचे सर्व कामकाज मराठी भाषेतून करणे बंधनकारक असेल.

५.८.६ समभाग भांडवली बाजारातील (Share Market) सर्व वित्त संस्थांच्या व उद्योगांच्या व्यवहाराबाबतची सर्व माहितीपत्रके, अर्ज, परिपत्रके, प्रपत्रे इत्यादी मराठी भाषेतून उपलब्ध व्हावीत यासाठी भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ (सेबी) यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल.

५.८.७ महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमधील ग्राहकाभिमुख असे सर्व कामकाज मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जाईल.

५.८.८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील (आयटीआय) अभ्यासक्रम, परीक्षा इत्यादी मराठी भाषेतून उपलब्ध केले जातील.

५.८.९ शासनाच्या प्रचलित औद्योगिक धोरणानुसार, औद्योगिक संस्थांमध्ये मराठी भाषेतून व्यवहार करण्यासाठी मराठी अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचा आग्रह धरला जाईल.

५.८.१० नवीन उद्योगांना परवानगी देताना तेथील व्यवहारात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याचा आग्रह धरला जाईल.

५.८.११ अशासकीय औद्योगिक संस्थांमध्ये जे अमराठी भाषक सेवक असतील त्यांना मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान प्राप्त झाले असल्याचे प्रमाणपत्र नोकरीस लागल्यापासून दोन वर्षांच्या आत सादर करणे बंधनकारक असेल. असे प्रमाणपत्र मराठी परीक्षा घेणाऱ्या शासनमान्य संस्थांकडून किंवा भाषा संचालनालयाकडून घ्यावे लागेल. त्याचप्रमाणे विद्यापीठाने असे अभ्यासक्रम सुरू केल्यास विद्यापीठाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

५.८.१२ औषधी उत्पादने, सौंदर्यप्रसाधने, अन्न उद्योग, कृषि उद्योग, मॉल/मोठी दुकाने सेवाक्षेत्रांसह सर्व औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादनावरील वेष्टने, सोबतची माहितीपत्रके, हमीपत्रे (Warranty/Guarantee) इत्यादी सर्व कागदपत्रे इंग्रजीसोबत मराठीत किंवा केवळ मराठी भाषा व देवनागरी लिपीत देणे बंधनकारक केले जाईल.

५.८.१३ पथकर (Toll) नाक्यांवरील सर्व माहिती, सूचना, पावत्या व नामफलक इत्यादी बाबी मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जाईल.

५.८.१४ सर्व प्रकारच्या उद्योग, व्यापार, सेवा व इतर सर्व क्षेत्रातील प्रशासकीय व इतर व्यवहार इंग्रजी भाषेसह मराठी भाषेत करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

५.८.१५ महाराष्ट्रामध्ये असणारी सर्व प्रकारची उपाहारगृहे, विश्रांतीगृहे (Hotels) दुकाने इत्यादी ठिकाणचे नामफलक, दरपत्रके, पावत्या इत्यादी सर्व व्यवहार मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जाईल.

५.८.१६ औषध विक्रेत्यांकडे उपलब्ध असणारी Booklet of Generic Medicine ही पुस्तिका मराठीतून उपलब्ध करून दिली जाईल.

५.८.१७ महाराष्ट्र शासनाच्या करनिर्धारणातील कामकाज मराठी भाषेतून करण्याचे अनिवार्य केले जाईल.

५.८.१८ सार्वजनिक व्यवहारांमध्ये मराठी भाषेची दृश्यात्मकता वाढविण्यासाठी तसेच अन्य भाषेशी समानता येण्यासाठी शासनाचे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कायदे व नियम यांच्या तरतुदींमध्ये आवश्यक त्या सर्व दुरुस्त्या केल्या जातील. त्यानुसार छापनावे, बोध शीर्षके, उत्पादित वस्तुंच्या वेष्टनावरील मजकूर, शहरांतील पथदर्शक नावे, दुकाने आणि आस्थापनांची नावे व सूचनाफलक, मॉल (Malls) विभागांची नावे, इत्यादी सर्व ठिकाणी अग्रक्रमाने/प्राधान्याने मराठी भाषेचा, देवनागरी लिपीचा वापर केला जाईल.

५.८.१९ मराठी भाषा, साहित्य, कला व संस्कृतीच्या विकासासाठी काम करणाऱ्या नवउद्यमी (स्टार्ट अप) कंपन्यांना विशेष अनुदाने तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये याबाबत संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळांना संशोधन अनुदाने दिली जातील.

५.८.२० संगणक वापराच्या व संशोधनाच्या दृष्टीने मराठी सक्षम करण्यासाठी संगणकीय मराठी भाषेच्या शब्दांचा, वाक्यांचा आणि नमुने व प्रारूपे यांचा संचय तयार केला जाईल.

## ५.९ प्रसारमाध्यमे

५.९.१ महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र शासन अंगीकृत कंपन्या, मंडळे, महामंडळे, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादींकडून मराठी वृत्तपत्रात दिल्या जाणाऱ्या सर्व जाहिराती, निविदा, सूचना, इत्यादी मराठी भाषेतूनच दिल्या जातील व त्यांचा मसुदा बिनचूक राहील याकडे लक्ष दिले जाईल.

५.९.२ सर्व प्रकारच्या मुद्रित, श्राव्य, दृकश्राव्य आदि समाजमाध्यमात मराठी भाषेचा अचूक वापर व्हावा म्हणून मराठी भाषेच्या वापराची संहिता आणि शैली पुस्तिका निर्माण करून त्यांचा वापर करण्यासाठी समाजमाध्यमांना प्रोत्साहित केले जाईल. त्यासाठी कार्यशाळा व चर्चासत्रांचे नियमितपणे आयोजन करण्यात येईल.

५.९.३ जाहिरातीविषयक शासकीय धोरणाच्या निकषांत वृत्तपत्रे व अन्य माध्यमांची प्रतवारी (rating) ठरवताना इतर निकषांसोबत त्यांच्या वापरातील मराठी भाषेच्या दर्जाचा विचार केला जाईल.

५.९.४ खाजगी उद्योगांनी महाराष्ट्रात विविध माध्यमांद्वारे जाहिराती देताना प्राधान्याने मराठीतून द्याव्यात तसेच त्या जाहिरातीतील मराठी भाषेचा दर्जा उत्तम राखण्याचा प्रयत्न करावा असे उद्योगांना सूचित केले जाईल.

५.९.५ मराठी भाषेचा विकास आणि संवर्धन करण्यासाठी कल्पक आणि अभिनव कार्यक्रमांचे प्रसारण करणाऱ्या अन्य प्रसारमाध्यमांना शासनाद्वारे विशेष पुरस्कारांनी सन्मानित केले जाईल.

५.९.६ लहान मुलांसाठी कार्यक्रम प्रसारित करणाऱ्या वाहिन्या आणि माहितीपर वाहिन्यांवरील (उदा. डिस्कव्हरी, नॅशनल जिओग्राफीक) कार्यक्रमांच्या समालोचनात (Commentry) मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध करून देण्याचा आग्रह धरला जाईल.

५.९.७ पत्रकारितेच्या अभ्यासक्रमामध्ये उपयोजित मराठी भाषा या विषयाचा समावेश करण्यात येईल.

५.९.८ पत्रकारांच्या सेवांतर्गत मराठी भाषिक प्रशिक्षणाची नियमित व्यवस्था केली जाईल. मुद्रित शोधन, उच्चारण, सादरीकरण, शब्दसंग्रह, भाषाशास्त्र इत्यादी विषयांचे अद्ययावत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाईल.

५.९.९ माध्यमांसह सर्व उद्योगांना नव्याने परवाने देताना किंवा त्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण करताना, त्यांनी भाषा धोरणातील संबंधित तरतुदींची अंमलबजावणी केली आहे असे त्यांना भाषा संचालनालयाकडून प्रमाणित करून घ्यावे लागेल.

## ५.१० कोश निर्मिती

५.१०.१ मराठी शब्दकोशात उच्चारदर्शक संकेत समाविष्ट केले जातील.

५.१०.२ समग्र देवनागरी अक्षरांचा कोश तयार करण्यात येईल. सदर कोश प्रमाणभूत मानण्यात येईल.

५.१०.३ मराठीचा श्राव्य उच्चारणकोश निर्माण केला जाईल.

५.१०.४ बोली भाषांचे व्याकरण, ध्वनिउच्चारण, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, अभ्यस्त

शब्द, म्हणी, वाक्प्रचार इत्यादींचा समावेश असेल असे बोली भाषांचे शब्दकोश तयार केले जातील.

५.१०.५ बोलींमधील मराठीतील शब्दांना पर्यायवाची असलेल्या योग्य शब्दांची मराठी भाषेत भर घातली जाईल.

५.१०.६ मराठी भाषा न्यायव्यवहाराची भाषा म्हणून विकसित करण्यासाठी विधि संकल्पना व परिभाषा कोश तयार करण्यात येईल.

## ५.११ मराठी ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्यासाठीच्या उपाययोजना

### भूमिका

आजचे एकविसावे शतक हे ज्ञानाचे शतक आहे आणि मातृभाषा ही आपली ज्ञानभाषा असते, या दोन सूत्रांचा विचार करता ब्रिटिश कालखंडात इंग्रजांनी इंग्रजीला प्रशासकीय कामकाज, विद्यापीठीय शिक्षण आणि न्यायालयाची भाषा केल्यामुळे देशभर इंग्रजी भाषेचे ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित झाले. स्वातंत्र्योत्तर काळात देखील इंग्रजीची जागा घेण्याइतपत मराठीसह अन्य प्रांतिक भाषांचा ज्ञानभाषा म्हणून विकास झाला नाही. उलट संपर्क भाषा म्हणून आजही इंग्रजीचे महत्त्व अबाधित आहे.

मराठी (व अन्य प्रांतिक भाषा) ज्ञानभाषा म्हणून विकसित न होण्याचे प्रमुख कारण म्हणजे ज्या क्षेत्रात उच्च दर्जा व वेतनाच्या विपुल संधी आहेत, त्या आधुनिक ज्ञान विज्ञानाचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन (अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान आदि विषयांचे) शिक्षण केवळ इंग्रजीतून देण्यात येते हे आहे. त्यामुळे रोजगारासाठी इंग्रजी आवश्यक असणारी ज्ञानभाषा आहे, हे भारतीय पालकांच्या व त्यांच्या पाल्यांच्या मनावर कोरले गेले व त्यामुळे ते आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेऊ लागले, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

जोवर उच्च शिक्षण म्हणजे पदवी व पदव्युत्तर शिक्षण- विज्ञान, तंत्रज्ञानासह सर्व आधुनिक ज्ञानशाखेचे शिक्षण मराठीतून उपलब्ध करून दिले जाणार नाही तोवर मराठी ज्ञानभाषा म्हणून विकसित होऊ शकणार नाही.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेत देण्याची महत्त्वपूर्ण शिफारस आहे, त्यानुसार काही निवडक प्रादेशिक भाषेत (मराठीसह) ऐच्छिक पद्धतीने अभियांत्रिकीचा बी टेक हा अभ्यासक्रम देशात ५० अभियांत्रिकी महाविद्यालयात दोन वर्षांपासून सुरू झाला आहे. महाराष्ट्र शासनानेही वैद्यकीय शिक्षण( MBBS) मराठीत सुरू करण्याचा निर्णय घेतला असे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे मराठीतून विज्ञान व तंत्रज्ञानाचे शिक्षण ऐच्छिक पद्धतीने सुरू करण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मराठी ज्ञानभाषा करण्यासाठी पुढील महत्त्वाच्या शिफारशी करण्यात येत आहेत:

५.११.१ डिजिटल विश्वात मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी मराठीतले सर्व उपलब्ध नवे जुने शब्दकोश (Dictionary), (विश्वकोश वगळून) सर्व महत्त्वाचे शब्दकोश उदा. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांचा महाराष्ट्रीय ज्ञानकोश, पं. महादेवशास्त्री जोशी यांचा भारतीय संस्कृतीकोश, स. मा. गर्गे

यांचा भारतीय समाजविज्ञान कोश, तसेच क्रीडा, पक्षी, वने, विविध बोलीभाषा कोश आणि जुनी दुर्मीळ पुस्तके, वैचारिक व ललित साहित्य आंतरजालावर (इंटरनेटवर) ओ.सी.आर. तंत्राचा वापर करून डाऊनलोड व प्रिंट करता येतील अशा रीतीने सर्वांना मोफत उपलब्ध करून देण्याचे काम मराठी भाषा विभागामार्फत सातत्याने केले जाईल.

५.११.२ विकिपीडिया हा मुक्त ज्ञान माहिती कोश सर्वांना मोफत उपलब्ध आहे. त्यावर मराठी नोंदी, लेख आणि संदर्भ फार कमी आहेत. मराठी विकिपीडिया जेवढा समृद्ध होईल तेवढा तो वाचक, अभ्यासक, शिक्षक/ प्राध्यापक आणि पत्रकार आदिंना त्यांच्या अभ्यासासाठी वापरता येईल. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग एक अभियान सुरू करेल. महाराष्ट्रातील सर्व केंद्रीय, राज्य, खाजगी व अभिमत विद्यापीठे व काही नामांकित संस्थांशी सामंजस्य करार करून व त्यांना आर्थिक मदत देऊन हे काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.

५.११.३ विकिपीडिया, विक्शनरी व विकिस्रोत या मुक्त ज्ञानस्रोतांमध्ये हे साहित्य शोधनीय रूपात आणण्यासाठी प्रशिक्षण शाळा घेऊन एक कृतीगट स्थापन करण्यात येईल. हे साहित्य विविध भारतीय भाषांशी जोडणे या प्रकल्पांमध्ये सहज शक्य होईल.

५.११.४ 'बदलते डिजिटल ज्ञानस्रोत व भाषा तंत्रज्ञान' याविषयी व साहित्य क्षेत्रांशी संबंधित व्यवसाय- जसे टंकन, संपादन, मुद्रित शोधन, मुद्रण, सादरीकरण इत्यादींशी संबंधित गटांची चर्चासत्रे व कार्यशाळा सातत्याने घेतल्या जातील, ज्याद्वारे एकसंकेत (युनिकोड), दृष्य अक्षर वेचक (ओसीआर) (Optical Character Recognition), फ्री व ओपन सोर्स प्रणाली, डेटाबेस व्यवस्थापन, बोलींचे लेखी (स्पीच टू टेक्स्ट) इ. चे प्रशिक्षण देण्यात येईल.

५.११.५ महाराष्ट्रात १००-१५० वर्षांची परंपरा असलेली अनेक ग्रंथालये आहेत. दुर्मीळ, विस्मृतीत गेलेली व प्रतिमुद्राधिकारयुक्त झालेली मौल्यवान ग्रंथसंपदा सुव्यवस्थितपणे नोंदवून डेटाबेस तयार करणे, डिजिटाईझ करून विकीस्रोतावर आणणे. लेखकांना व वारसांना प्रतिमुद्राधिकारमुक्तीसाठी आवाहन करणे. अशा रीतीने आंतरजालावर मराठी भाषा समृद्ध व संदर्भ विपुल करण्यात येईल. हे सतत चालणारे अभियान स्वरूप काम विभागाचे असेल.

५.११.६ स्थायी स्वरूपाची एक अनुवाद अकादमी स्थापन करण्यात येईल. या अकादमीच्या तीन उप-अकादमी असतील आणि त्यांचे प्रयोजन पुढीलप्रमाणे असेल :-

(अ) आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे व अन्य ज्ञान क्षेत्रातील महत्त्वाचे ग्रंथ, संशोधनपर प्रबंध व लेख मराठीत अनुवाद करणे व मराठीतले मौलिक संशोधन इंग्रजीद्वारे जगात पोचवण्यासाठी 'ज्ञानभारती अनुवाद अकादमी'

(ब) मराठीतील दर्जेदार व मौलिक ललित, वैचारिक व ज्ञान-माहितीपर साहित्य हिंदी व इतर भारतीय भाषेत नेण्यासाठी व या भाषांतील निवडक साहित्य मराठीत आणण्यासाठी 'आंतरभारती अनुवाद अकादमी' आणि

(क) मराठीतील दर्जेदार व मौलिक ललित, वैचारिक व ज्ञान-माहितीपर साहित्य जगात इंग्रजी व अन्य महत्त्वाच्या परकीय भाषांमध्ये नेण्यासाठी व त्या भाषेतील निवडक साहित्य मराठीत आणण्यासाठी 'विश्वभारती अनुवाद अकादमी'.

५.११.७ अनुवाद अकादमी मार्फत ५.११.६ प्रमाणे अनुवादित पुस्तके निर्माण करण्यासाठी अनुवादकांची फळी निर्माण करणे, अनुवादकांना शिष्यवृत्ती व लेखन निवास शिष्यवृत्ती देणे आणि पुस्तक प्रकाशन अशा बाबींसाठी एक नवी सर्वंकष स्वरूपाची योजना तयार करण्यात येईल.

५.११.८ मराठी विकिपीडियावर सातत्याने लेख, नोंदी, संदर्भ आणि पुस्तके, प्रबंध विपुल प्रमाणात प्रसिद्ध करण्यासाठी (दरवर्षी किमान एक लाख नोंदी अपलोड करण्यासाठी) मराठी भाषा विभाग आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने एक स्थायी स्वरूपाची समिती स्थापन केली जाईल आणि अशा लिखाणासाठी लेखक, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, पत्रकार व इतर नागरिकांना प्रोत्साहित केले जाईल.

५.११.९ आंतरजालावर मराठी समृद्ध करण्यासाठी सर्व उपलब्ध शब्दकोश, इतर कोशवाङ्मय आणि महाराष्ट्रातील शतायुषी व इतर दुर्मीळ पुस्तके असणाऱ्या वाचनालयातली महत्त्वाची ज्ञान व माहितीची पुस्तके नवतंत्रज्ञान जसे की दृष्य अक्षर वेचक (ओसीआर) व अन्य तंत्र वापरून एकसंकेतामध्ये (युनिकोड) आंतरजालावर अपलोड करण्यासाठी सातत्याने काम करण्यासाठी यंत्रणा निर्माण केली जाईल.

५.११.१० सर्व विद्यापीठांतील इंग्रजीतून लिहिलेले प्रबंध मराठीत अनुवाद करण्यासाठी व आंतरजालावर अपलोड करण्यासाठी विद्यापीठांना प्रोत्साहित केले जाईल.

५.११.११ जोवर उच्च शिक्षणाची भाषा मराठी होत नाही, तोवर ती खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा (आणि पर्यायाने रोजगाराची भाषा) होणार नाही म्हणून उच्च शिक्षण हे इंग्रजी सोबत मराठीत ऐच्छिक पर्याय म्हणून उपलब्ध करून दिले जाईल. पदवी परीक्षेच्या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमाची दर्जेदार पाठ्यपुस्तके व पूरक संदर्भ ग्रंथ व्यासंगी प्राध्यापकांकडून लिहून घेतले जातील व मराठीतून उच्च शिक्षण देण्यासाठी पहिल्या टप्प्यात इच्छुक महाविद्यालयांना - प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे परवानगी दिली जाईल आणि त्याचा अनुभव व प्रतिसादाचा विचार करून विस्तार केला जाईल पण विद्यार्थ्यांच्या अन्य राज्यात व परदेशातील संभाव्य रोजगाराच्या संधींचा विचार करून इंग्रजी हा विषय अनिवार्यपणे शिकवला जाईल.

५.११.१२ मराठी ज्ञान-विज्ञान, सामाजिक शास्त्रे व अन्य आधुनिक ज्ञानशाखांमधील विविध विषयांचे लेखन प्रकल्प राबवून ते प्रकाशित करण्यासाठी मराठी प्रकाशकांना प्रोत्साहित केले जाईल. त्यासाठी आर्थिक साहाय्याची योजना तयार करण्यात येईल.

५.११.१३ मराठी भाषेतून प्रसिद्ध होणारी विविध नियतकालिके व संदर्भ ग्रंथांत प्रकाशित होणाऱ्या विविध ज्ञानशाखांतील शोधनिबंधांचा एकत्रित संग्रह असणारे एक मध्यवर्ती डिजिटल अभिलेखागार (रिपॉझिटरी) उभारण्यात येईल व या संग्रहालयातील मराठी शोधनिबंधांचा अन्य अभ्यासकांनी केलेल्या वापराचा प्रभाव स्पष्ट होण्यासाठी (इम्पॅक्ट फॅक्टर) उद्धरण निर्देशांक (उपयोजनाची मोजणी) व प्रभावमूल्य निर्देशांक घोषित करणारी (थॉमस राऊटर्स सारखी) स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

## ५.१२ मराठी रोजगाराची भाषा म्हणून विकसित करण्याच्या उपाययोजना

### भूमिका

तांत्रिक व रोजगाराभिमुख शिक्षण, प्रशिक्षण ,उद्योजकता विकास आणि तद्नुषंगिक बाबी ज्या व जितक्या प्रमाणात मराठीतून होतील, त्या व तितक्या प्रमाणात मराठी ही रोजगाराची भाषा होईल. त्यासाठी पोषक अवकाश व पृष्ठभूमी निर्माण करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातील :-

५.१२.१ अर्धकुशल व रोजगाराभिमुख तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण मराठीतून ऑनलाईन व प्रत्यक्ष (ऑफलाईन) असे संमिश्र पद्धतीने देण्यासाठी शासनाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात स्वतंत्र अद्ययावत विभाग स्थापन केला जाईल किंवा स्वतंत्र मराठी कौशल्यविकास व व्यवसायशिक्षण विद्यापीठ स्थापन करून दरवर्षी एक लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाईल.

५.१२.२ सर्व विद्यापीठे, निवडक महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये रोजगार क्षमता असणाऱ्या क्षेत्राचे प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम मराठी किंवा मराठी-इंग्रजी अशा द्विभाषिक माध्यमात आपल्या परिक्षेत्रातील उद्योग व औद्योगिक संघाच्या सहकार्याने मागणी व पुरवठा तत्त्वाने खास तयार करून घेण्यात येतील या तत्त्वावर आणि असे अभ्यासक्रम शिकवण्याची योजना उद्योग व ऊर्जा विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग संयुक्तपणे कार्यान्वित करील.

५.१२.३ मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागणाऱ्या खाजगी उद्योग व कारखान्यांसाठी "कमवा, शिका आणि स्थायी नोकरी मिळवा" अशी योजना बनवून कारखानदारांना स्वेच्छेने आंगिकारण्यास प्रोत्साहन दिले जाईल. या योजनेतील शिक्षण व प्रशिक्षणासाठी त्यांनी आपला सी.एस.आर.-औद्योगिक सामाजिक जबाबदारीचा निधी वापरण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले जाईल.

५.१२.४ उद्योगजगतात वंचित घटकांचे प्रमाण वाढावे यासाठी उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील संस्थांबरोबर विचारविनिमय करून ऐच्छिक स्वरूपाची "सकारात्मक कृती"- Affirmative Action योजना / धोरण तयार करण्यात येईल व त्याद्वारे सामाजिक बांधिलकी आणि विश्वस्त भावनेने उद्योग समूह व कारखानदारांनी महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्री वर्ग या भूमिपुत्र संवर्गातील योग्य व्यक्तींना नोकर भरतीच्या वेळी आपणहून स्वेच्छेने ठरवलेल्या प्रमाणात भरती करून घेण्यासाठी उद्योग व कारखान्यांना प्रोत्साहित केले जाईल व दरवर्षी अशी उल्लेखनीय सकारात्मक कृती करणाऱ्या उद्योग आणि कारखान्यास सन्मानित केले जाईल.

५.१२.५ उद्योजकता प्रशिक्षण, अर्थ साक्षरता व स्वयंरोजगार देणारे शिक्षण- प्रशिक्षण, विपणन (मार्केटिंग) यांचा समावेश असणाऱ्या आणि खास तयार करण्यात आलेल्या मराठी भाषेतील रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाद्वारे मध्यम स्वरूपाचे तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करणारे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी सार्वजनिक-खाजगी क्षेत्र भागीदारी म्हणजेच PPP मोडमध्ये एक "मराठी रोजगार-स्वयंरोजगार आभासी प्रशिक्षण संस्था (Marathi employment- self-employment Digital Institute) स्थापन केली जाईल व विद्यार्थ्यांना माफक फीमध्ये प्रशिक्षित केले जाईल.

५.१२.६ महाराष्ट्रात महिला बचत गटांची संख्या लक्षणीय आहे,अशा बचत गट महिलांना स्वतंत्रपणे किंवा गटाद्वारे छोटे उद्योग सुरू करण्यासाठी, तसेच बँक व्यवहार, अर्थ साक्षरता, प्रकल्प अहवाल बनवणे, ब्रँडिंग व मार्केटिंग आदिंचे समुचित प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA), अग्रणी बँक आणि नगरपालिका/महानगरपालिका यांना एका व्यासपीठावर आणून एक प्रशिक्षण यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात निर्माण करण्यात येईल आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रम मराठीतून बनवून प्रशिक्षण दिले जाईल. यासाठी जिल्ह्यातील उद्योजक, तंत्रनिकेतन, औद्योगिक संघ यांची एक सल्लागार समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येईल व सदर प्रशिक्षण संस्थेचे संचालन व्यावसायिक पद्धतीने चालवण्यात येईल. सदर समिती रोजगार विनिमय (एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज) वजा स्वयंरोजगार निर्मिती केंद्र म्हणून काम करेल.

५.१२.७ प्रत्येक मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या औद्योगिक कारखान्यात व इतर उद्योगात मनुष्यबळ विकास - Human resource Development- HR विभाग असतो, तो नवीन कर्मचारी / तंत्रज्ञ भरती व अंतर्गत प्रशिक्षण इत्यादी कामे करत असतो. या विभागात कार्यरत अधिकाऱ्यांमधून एक मराठी अधिकारी मनुष्यबळ विकास प्रमुखांच्या हाताखाली नियुक्त करणे व त्याच्या मदतीने कर्मचारी भरतीच्या वेळी इंग्रजीसोबत मराठीतून मुलाखत घेणे, अंतर्गत प्रशिक्षण द्विभाषिक स्वरूपात करणे आदि कार्यवाही उद्योगसमूह व कारखान्यांनी स्वेच्छेने करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहित केले जाईल.

५.१२.८ प्रत्येक विद्यापीठ त्यांचे अभ्यासक्रम तयार करताना अभ्यासक्रमात उद्योग, सेवा आणि अन्य आर्थिक विकासाच्या क्षेत्रातील तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या सहभागाने काही मोड्यूल्स बनवेल किंवा स्पर्धेद्वारे मागवून निवडेल. विद्यार्थी त्यातील निश्चित केलेल्या संख्येत- दोन वा तीन मोड्यूल्स अभ्यासक्रमाचा भाग म्हणून निवडतील आणि त्याचे वर्गात तसेच कारखान्यात शिकाऊ उमेदवारी पद्धतीने प्रशिक्षण मराठी-इंग्रजी अशा संमिश्र भाषेत दिले जाईल. यासाठी विद्यापीठांना आर्थिक साहाय्य करण्याची योजना तयार करण्यात येईल.

५.१२.९ वेगाने वाढणाऱ्या मनोरंजन, जाहिरात आणि वृत्त/बातमी क्षेत्रासाठी लागणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सर्जनशील स्वरूपाच्या पटकथा व टीव्ही मालिका लेखन, ललितेतर वृत्त व माहितीपट लेखन, आशय लेखन (कंटेंट रायटिंग), नाट्यलेखन यांचे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम मराठी वा मराठी-इंग्रजी संमिश्र भाषेतून शिकवण्यासाठी महाराष्ट्रातील महाविद्यालयांना त्याच्या निर्मितीसाठी एक विशेष योजना तयार करून प्रोत्साहित केले जाईल.

५.१२.१० महाराष्ट्रातील राज्यस्तरीय/ विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय औद्योगिक संघाच्या मदतीने उद्योजकता विकास, अर्थ साक्षरता आदिद्वारे मराठी माणसात उद्योजकता आणि व्यापारी वृत्ती निर्माण होण्यासाठी व वृद्धिंगत होण्यासाठी चर्चासत्रे, औद्योगिक भेटी, प्रदर्शने, रोजगार मेळा आदि उपक्रम राबवून उद्योग व वाणिज्य प्रधान महाराष्ट्र घडविण्यासाठी शासनाचा उद्योग विभाग काम करील.

## ५.१३ मराठी साहित्य, कला व संस्कृतीचा राज्यात, देशात व जगभरात प्रसार करणे

५.१३.१ मराठी चित्रपट, नाटक आणि साहित्यिक कार्यक्रम, पुस्तक विक्री केंद्र, स्थानिक पातळीवरील सांस्कृतिक व साहित्यविषयक कार्यक्रमासाठी हक्काची सुसज्ज वास्तू असावी म्हणून प्रत्येक तालुक्यात "तालुका तेथे क्रीडा संकुल" योजनेप्रमाणे तालुकानिहाय चित्र -नाट्य- साहित्य व कला संकुल बांधण्याची योजना तयार करून ती दहा वर्षांत सर्व ३६५ तालुक्यांत अंमलात आणली जाईल. त्यामुळे मराठी चित्रपट व नाटकांना नवीन प्रेक्षक मिळेल व मराठीचा प्रसार होईल. पुस्तक विक्री केंद्रामुळे वाचन संस्कृती वाढीस लागेल, लोककलेचे जतन व संवर्धन होईल आणि तालुका स्तरावर एक हक्काचे साहित्य व संस्कृतीचे केंद्र विकसित होईल.

५.१३.२ मनोरंजन क्षेत्रात मुंबई शहराचे प्रथम स्थान कायम राहावे म्हणून चित्रनगरी मुंबईत चित्रपट, नाटक, रेडिओ/टीव्ही,नृत्य व संगीताचे शिक्षण (पदविका ते पदव्युत्तर अभ्यासक्रमाद्वारे मराठी/हिंदी/इंग्रजी अशा संमिश्र पद्धतीने) देणारी संस्था स्थापन करण्यात येईल आणि त्याद्वारे मराठी व हिंदी चित्रपट, नाटक आणि इतर कलांसाठी लागणारे कलावंत व तंत्रज्ञ कलाक्षेत्रास उपलब्ध होतील व मराठीची महत्ता वाढण्यास मदत होईल.

५.१३.३ उत्तम मराठी चित्रपटांचे महोत्सव दरवर्षी देशातील महत्त्वाच्या शहरांत भरविण्याची योजना आखली जाईल व कार्यान्वित केली जाईल.

५.१३.४ मराठी नाटक देशात अग्रेसर आहे. त्याची कलात्मकता आणि महत्ता देशभरात पद्धतशीरपणे पोचविण्यासाठी, ज्याप्रमाणे मराठी नाटकांना प्रति प्रयोग अनुदान दिले जाते, त्या प्रचलित योजनेची व्याप्ती वाढवून मराठी नाटकांच्या हिंदी व इंग्रजी प्रयोग करणाऱ्या देशातील नाट्यसंस्थांना प्रति प्रयोग अनुदान दिले जाईल.

५.१३.५ मराठी सिनेमा, नाटक, भावसंगीत, लोककला, व्याख्यानमाला, मुलाखती, पुस्तक, नाटक, चित्रपट केंद्रित कार्यक्रम, विविध साहित्य संमेलने व सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रक्षेपण याद्वारे मराठी भाषा व मराठी संस्कृती वर्धिष्णू करण्यासाठी महाराष्ट्राचे स्वतःचे दूरचित्रवाणी चॅनेल, OTT प्लॅटफॉर्म आणि FM रेडिओ सुरू करण्याची योजना आखली जाईल व त्याद्वारे मराठी चित्रपट, नाटक, साहित्याकडे तरुण पिढी आकर्षित होईल व मराठी ही तरुणाईच्या अभिव्यक्तीची भाषा बनेल.

५.१३.६ देशभरातील अन्य भाषिकांना संपन्न मराठी भाषिक संस्कृतीचा परिचय व्हावा म्हणून ‘मराठी महोत्सव’ (मराठी फेस्टिवल) दरवर्षी जेथे मराठी माणसे मोठ्या संख्येने निवास करीत आहेत अशा प्रमुख शहरात साजरा करण्यात येईल. त्यामध्ये मराठी पुस्तक मेळा, साहित्यिक कार्यक्रम, मराठी खाद्य महोत्सव, मराठी नृत्य-संगीत कार्यक्रम आदिंचा समावेश असेल.

## ५.१४ बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषा व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे

५.१४.१ अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाशी संलग्न अशा सहा संस्था (तेलंगणा, कर्नाटक, गोवा, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि बडोदा) आणि इतर शहरात दीर्घ काळापासून कार्यरत असणाऱ्या मराठी संस्थांसाठी एक विशेष योजना तयार करून त्या त्या प्रांतात मराठी जिवंत ठेवण्यासाठी व तिच्या संवर्धनासाठी या संस्थांना नियमित वार्षिक अनुदान व इतर पद्धतीने साहाय्य केले जाईल.

५.१४.२ साहित्य महामंडळ संलग्न सहा संस्थांना त्यांच्या मुख्यालयी मराठी साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी व कार्यालयासाठी एक स्वतःचे मराठी भवन बांधण्यासाठी एकरकमी अर्थसाहाय्य केले जाईल.

५.१४.३ बृहन्महाराष्ट्रात नियमितपणे प्रसिद्ध होणाऱ्या मराठी मासिकांना आर्थिक मदत, नियमित शासकीय जाहिराती, कार्यरत मराठी वाचनालयांना वर्ग एकचे अनुदान देणे, शासकीय पुस्तके ग्रंथालयास भेट देणे, या प्रांतात साहित्य संमेलने घेण्यासाठी-खासकरून कर्नाटक सीमाभागात दरवर्षी संपन्न होणाऱ्या साहित्य संमेलनासाठी तेथील संस्थांना वार्षिक आर्थिक अनुदान देणे अशा विविध उपाययोजनांद्वारे बृहन्महाराष्ट्रातली मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व वर्धिष्णू करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल.

५.१४.४ बृहन्महाराष्ट्रातील मराठी संस्था व तेथील मराठी भाषिकांचे भाषा, संस्कृती विषयक प्रश्न सोडविण्यासाठी मराठी भाषा विभागात एक स्वतंत्र विभाग / कक्ष स्थापन करण्यात येईल.

५.१४.५ महाराष्ट्राबाहेरील राज्यात व परदेशात निवास असणाऱ्या व मराठीतून लेखन करणाऱ्या लेखक/अनुवादकांना गुणवत्तेच्या आधारे साहित्यिक, वैचारिक आणि ज्ञाननिर्मितीपर पुस्तक लेखनासाठी शिष्यवृत्ती (फेलोशिप) देण्याची योजना सुरू करण्यात येईल.

५.१४.६ भारतातील इतर राज्यात व परदेशात निवास असणाऱ्या लेखक व संशोधकांची दर्जेदार मराठी पुस्तके महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित करण्यात येतील. तसेच खाजगी मराठी प्रकाशकांना प्रकल्पाधारित ग्रंथ निर्मितीसाठी प्रोत्साहन व प्रकाशनासाठी मदत केली जाईल.

५.१४.७ इतर राज्यात मराठी शाळा व महाविद्यालयांना अनेक वर्षांपासून आर्थिक निधीची कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. संबंधित राज्ये त्या पूर्ण करण्याबाबत उदासीन आहेत. म्हणून, महाराष्ट्र शासन पुढाकार घेऊन मराठी भाषेचे जतन व संवर्धनासाठी इतर राज्यातील मराठी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठातील कार्यरत वा बंद पडलेल्या विभागांना पुरेशी आर्थिक मदत करण्यासाठी सर्व संबंधित शिक्षणसंस्थांशी चर्चा करून एक विशेष योजना तयार करील.

५.१४.८ इतर राज्यातील शाळा व महाविद्यालयात सेवानिवृत्तीनंतर शिक्षक व प्राध्यापकांची नियुक्ती केली जात नाही म्हणून महाराष्ट्र राज्य तेथील मराठीच्या शिक्षणासाठी संबंधित राज्यांच्या सहमतीने महाराष्ट्रातील शिक्षक व प्राध्यापकांना प्रतिनियुक्तीने पाठविण्याची योजना तयार करील. अशा प्रतिनियुक्ती कालावधीसाठी शिक्षक व प्राध्यापकांना प्रोत्साहनपर अतिरिक्त वेतन आणि अन्य सुविधा देण्यात येतील.

## ५.१५ ग्रंथालय चळवळ बळकट करणे व ग्रंथालय धोरण आखण्याबाबत

### भूमिका

मराठी भाषेचे अस्तित्व, विकास आणि अस्मिता ही लिखित तसेच इ- बुक, वेब मासिके (IT आधारित) पुस्तके , नियतकालिके आणि वृत्तपत्रांवर आणि ती नियमित वाचणाऱ्या वाचकांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. त्यासाठी सार्वजनिक तसेच शालेय ग्रंथालयांची नितांत आवश्यकता आहे. आधुनिक युगात डिजिटल ग्रंथालयांचे महत्त्व वाढले आहे.

आज महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळ वाचनालयाच्या माध्यमातून फक्त २५ टक्के गावांपर्यंतच पोचली आहे. महाराष्ट्रात आज मराठी प्रकाशकांची संख्या अंदाजे चारशेच्या आसपास आहे व दरवर्षी अंदाजे किमान हजार ते पंधराशे पुस्तके प्रकाशित होत असतात. पण खाजगी पुस्तक विक्रेत्यांची संख्या अत्यल्प आहे. आजही ३०० पेक्षा अधिक तालुक्यांत पुस्तक विक्री केंद्रे नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सबब मराठी टिकण्यासाठी वाचन संस्कृती विकसित करणे व त्यासाठी ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत करणे अशी धोरण दिशा असणे आवश्यक आहे.

**शिफारशी :**

५.१५.१ ग्रंथालय संचालनालय हे सध्या उच्च तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. ते मराठी भाषा विभागाकडे वर्ग करावे. कारण मराठी भाषा विभागाचे Mandate किंवा कार्यकक्षा पाहता मराठीचा विकास हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. त्यामुळे ग्रंथालय चळवळ चैतन्यमय करणे आणि दिशा देणे हे काम मराठी भाषा विभाग अधिक सक्षमतेने करू शकेल.

५.१५.२ राज्याचे स्वतंत्र ग्रंथालय धोरण आखणे. महाराष्ट्राच्या ग्रंथालय संचालनालयाचे काम सर्वदूर पसरले आहे, तरी पुरेशी वाचन संस्कृती विकसित झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. ग्रंथालये ही निरंतर क्रियाशील असणारी ज्ञान केंद्रे व वाचक केंद्रित संस्कृती केंद्रे असायला हवीत. त्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ग्रंथपालांचे वेतनाचे व अन्य सेवाशर्तीचे प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. त्यामुळे ग्रंथालय चळवळ ही क्षीण झाली आहे. त्यामुळे वाचन संस्कृती विकसित करण्याचे दायित्व ती सक्षमतेने पार पाडू शकत नाही. त्यांच्या समस्या सोडविणे आवश्यक आहे.

शालेय ग्रंथालयांची अवस्था बिकट आहे. महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची पण नव्याने आखणी करण्यात येईल.

तसेच ग्रंथालयांना आत्मनिर्भर केले जाईल. कारण ती शासकीय अनुदान व वाचक वर्गणीतून चालवणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. तेथे ई-सेवा केंद्र, एटीएम, कॅफे आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित चे प्रशिक्षण केंद्र सुरू करून त्यांना आर्थिकदृष्ट्या कसे आत्मनिर्भर होता येईल याचा विचार केला जाईल.

प्रत्येक ग्रंथालय हे काळाची गरज म्हणून डिजिटल ग्रंथालय (Digital Library) म्हणून विकसित केले जाईल.

या व इतर आनुषंगिक महत्त्वाच्या विषयावर आधारित महाराष्ट्राचे स्वतंत्र ग्रंथालय धोरण बनविण्यात येईल. त्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमण्यात येईल व त्या आधारे ग्रंथालय व वाचन चळवळीस नवचैतन्य देण्यात येईल.

५.१५.३ गाव तेथे ग्रंथालय

आजही काही हजार गावांमध्ये ग्रंथालये नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. छोट्या गावात ग्रंथालये चालविणे खाजगी संस्थांना ग्रंथालय अनुदान असले तरी आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे राज्यातील प्रत्येक गावात ग्रंथालय स्थापन करण्यासाठी वेगळा विचार करणे आवश्यक आहे.

प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपालिकांनी त्यांच्या इमारतीत ग्रंथालय स्थापन करण्याची शासनाने योजना आखावी व त्यासाठी उत्पन्नाचा काही भाग, म्हणजेच, ५ टक्के खर्च करण्याचे प्रावधान करावे. त्यामुळे गाव तेथे ग्रंथालय हे उद्दिष्ट नजीकच्या भविष्यात साकार करता येईल.

ग्रामपंचायत / नगरपालिका कायद्यांमध्ये सुधारणा करून ग्रंथालय उपकर लावण्याची तरतूद करण्यात येईल.

कर्नाटक राज्यात कोविड काळात सर्व ग्राम वाचनालये ग्रामीण विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असून या सर्व ग्राम वाचनालयांनी कात टाकली असून मुले व इतर लोक वाचनाकडे मोठ्या प्रमाणात वळली आहेत. त्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींनी लक्ष घातले होते. त्या धर्तीवर ग्रामपंचायत व नगरपालिका/महानगरपालिकेद्वारे अद्ययावत ग्रंथालये स्थापन करण्याचा महाराष्ट्र शासन निर्णय घेईल आणि निर्मल ग्राम अभियानाप्रमाणे " वाचन अभियान" राबविण्याचे अभियान सुरू करील.

५.१५.४ शासन अनुदानित ग्रंथालयाचे सक्षमीकरण करणे

सद्य:स्थितीत महाराष्ट्रात १२००० पेक्षा अधिक ग्रंथालये कार्यरत आहेत. ती अधिक सक्रिय, वाचनाभिमुख व्हावीत व त्यांनी वाचकांना वाचनासाठी प्रवृत्त करावे; यासाठी "ग्रंथालय माझ्या गावाचा मानबिंदू" किंवा अन्य सुयोग्य नावाने खालील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एक शासन निर्णय जारी करून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

अ) सर्व ग्रंथालयांची अकस्मात पडताळणी करून त्याचे मूल्यांकन करावे व १ ते ५ स्टार-तारांकित असे मानांकन देण्यात येईल. त्यासाठी अत्यंत काटेकोर असे निकष ठरविण्यात येतील.

ब) चार व पाच तारांकित ग्रंथालयांना बक्षीस तर एक व दोन तारांकित ग्रंथालयांना दंड अशी तरतूद करण्यात येईल.

क) दरवर्षी तालुका/जिल्हास्तरावर ग्रंथपालांची एक दिवसीय कार्यशाळा घेऊन त्यांना वर्षभर वाचन संस्कृती विकसित करणे व अधिकाधिक लोक नियमित वाचन करून बहुश्रुत व सुजाण होतील यासाठी काय काय उपक्रम राबवावेत यांची एक यादी देऊन हे कार्यक्रम कसे राबवावेत याचे मार्गदर्शन करण्यात येईल व दरमहा दोन कार्यक्रम घेण्यास सांगण्यात येईल. त्याचे योग्य संनियंत्रण करण्यात येईल. हा वर्षभराचा उपक्रम तारांकित मानांकनाचा एक भाग असेल. यामुळे ग्रंथालयांची मरगळ झटकली जाईल आणि वाचन संस्कृती वाढीस लागेल.

ड) ग्रंथालय मित्र आणि सदिच्छा दूत उपक्रम

अमेरिकेत प्रत्येक ग्रंथालयाचे “ग्रंथालय मित्र” (Friends of Library) असतात. ते गावातील दानशूर व्यक्ती, वाचनप्रेमी अधिकारी/पदाधिकारी आणि शिक्षक-प्राध्यापक-शासकीय व बँक अधिकारी असतात. ते दरवर्षी ग्रंथालयास पुस्तके, रॅक-कपाटे आणि संगणक आदिंच्या भेटी देतात. एखाद दुसऱ्या मासिक/ वृत्तपत्राची वार्षिक वर्गणी भरतात. त्या धर्तीवर प्रत्येक ग्रंथालयाकडून किमान १० ते कमाल कितीही "ग्रंथालय मित्र" मिळविण्यात येतील आणि त्यांना मदतीसाठी प्रवृत्त करण्यात येईल. त्यांच्याकडून वाढदिवस, वाड-वडिलांच्या स्मृतिदिनी / लग्न आदि वेळी पुस्तके , अन्य साहित्य किंवा देणगी मिळविण्यात येईल. ग्रंथमित्रामुळे गावच्या वाचनालयास प्रतिष्ठा प्राप्त होईल.

दुसरी अभिनव कल्पना म्हणजे ग्रंथालय सदिच्छा दूत होय! हा गावात राहणारा किंवा शहरात/ परदेशी असणारा नामांकित व्यक्ती असेल. तो दरवर्षी गावी एका बड्या पाहुण्यास ग्रंथालयात घेऊन येईल आणि त्याचे मार्गदर्शन गावास लाभेल. हा सदिच्छा दूत देखील ग्रंथालयास देणगी किंवा पुस्तके मिळवून देऊ शकेल.

यासाठी एक परिपत्रक काढण्यात येईल आणि सर्व जिल्ह्यांचे ग्रंथालय अधिकारी आणि जिल्हा मराठी समितीचा सदस्य सचिव- जो उपजिल्हाधिकारी असतो,त्यांना हा उपक्रम राबविण्यास सूचित करण्यात येईल.

इ) ग्रंथालयाच्या पुस्तक खरेदीसाठी नवी नियमावली व शासन निर्णय काढण्यात येईल.

आज अनेक ग्रंथालयांत सुमार व रद्दी पुस्तकांचा भरणा आढळून येतो. त्यामागची कारणे सर्वज्ञात आहेत. त्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे अनुदान वाया जाते व वाचक रद्दी पुस्तकांमुळे ग्रंथालयाकडे पाठ फिरवतात. म्हणून जिल्हा स्तरावर एक ग्रंथ खरेदी समिती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात येईल, त्यात जिल्ह्यातील नामवंत व शासन पुरस्कारप्राप्त तीन लेखक, डॉ. आंबेडकर पुरस्कार प्राप्त दोन ग्रंथपाल, महाविद्यालयातील मराठीचे दोन उत्तम प्राध्यापक व ग्रंथपाल, शालेय ग्रंथालयांचे दोन उत्तम ग्रंथपाल, आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशा सदस्यांचा समावेश करण्यात येईल. दरवर्षी ही समिती पुस्तके निवडील. त्यासाठी शासन व इतर महत्त्वाच्या संस्थांची पुरस्कारप्राप्त पुस्तके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी यांची पुस्तके तसेच ललित बरोबरच वैचारिक, ज्ञान/विज्ञान, मानव्य शास्त्र आदिंची पुस्तके, २० टक्के बालसाहित्य व १५ टक्के स्त्री साहित्य खरेदी असे काही निकष ठरवून देता येतील. तसेच पट्टीच्या वाचकांकडून देखील यादी मागविण्यात येईल. मुख्य म्हणजे जास्त सवलतीची पुस्तके खरेदी करण्याची अट नसावी. याप्रमाणे पुस्तक खरेदी केली तर ग्रंथालये दर्जेदार होतील व वाचकवर्ग आकृष्ट होईल.

## ५.१६ वाचन संस्कृती विकसित करणे

### भूमिका

एखाद्या देशाची व राज्याची महत्ता मोजण्याचे जे अनेक निकष आहेत, त्यात तेथली वाचन संस्कृती किती प्रगल्भ आहे व लोक किती व काय वाचतात हा एक महत्त्वाचा निकष आहे. ग्रंथालय हे गावचे सांस्कृतिक/ साहित्यिक केंद्र बनणे व ते वाचकांनी सदैव भरलेले असणे हा गावचा मानबिंदू असला पाहिजे.

मराठी भाषा राज्यात अग्रस्थानी असण्यासाठी व तिचा समुचित विकास होण्यासाठी रसरशीत वाचन संस्कृती विकसित होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील शिफारशी अंमलात येणे महत्त्वाचे राहील.

**शिफारशी :**

५.१६.१ पुस्तकांच्या उपलब्धतेसाठी प्रत्येक तालुक्यात ग्रंथ विक्रीकेंद्रे बांधणे.

यासाठी महाराष्ट्रातील सर्व ३५६ तालुक्यांत व मोठ्या दहा हजार वस्तीच्या गावी एक पुस्तक विक्रीकेंद्र ठेवण्यात येईल. त्यासाठी शासनाने प्रत्येक तालुका व नगरपालिकेस अनुदान देऊन साधारणपणे ५००/७००/ १००० चौ. फूटाचे दुकान बांधून ते पुस्तक विक्रेत्यास कमी भाडेतत्त्वावर चालविण्यास देण्यात येईल.

राज्यात आज अनेक गावांत ग्रामपंचायत इमारतीत एखादा गाळा वा समाज मंदिर सहजतेने उपलब्ध होऊ शकते. हीच बाब नगरपालिकेची आहे. तेथे पुस्तक विक्रीकेंद्रे त्यांना सुरू करता येतील.

ग्रामपंचायत व नगरपालिकेस आमदार निधी, जिल्हा नियोजन आणि विकास समिती (DPDC) मधून बांधकामासाठी निधी देण्याची तरतूद करण्यात येईल. मात्र महानगरपालिका आणि 'अ' वर्ग नगरपालिकेस तो देण्याची गरज नाही. त्यांनी स्वनिधीतून असे पुस्तक विक्रीकेंद्र बांधून उपलब्ध करून द्यावे.

तालुक्यातील सर्व ग्रंथालयांना अशा पुस्तक विक्रीकेंद्रातून किमान ६० टक्के पुस्तके खरेदी करणे अनिवार्य करण्यात येईल.

५.१६.२ शालेय ग्रंथालये समृद्ध करणे व विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करणे:-

यासाठी पुढील बाबींसाठी एक विस्तृत शासन निर्णय काढावा.

अ) शालेय ग्रंथालये समृद्ध करणे

त्यासाठी आमदारांचा स्थानिक विकास निधी, जिल्हा नियोजन आणि विकास समिती (DPDC), आणि ग्रामपंचायत व नगरपालिका/महानगरपालिका यांनी स्वनिधीतून काही रक्कम शालेय ग्रंथालयाकडे पुस्तक खरेदीसाठी वर्ग करावी. त्यामुळे ग्रंथालये संपन्न होतील.

ब) प्रत्येक विद्यार्थी व गावकऱ्यांनी ऐच्छिक पद्धतीने आपला वाढदिवस शाळेस एक उत्तम पुस्तक भेट देऊन साजरा करावा, यासाठी शिक्षकांकडून प्रयत्न करण्यात येतील.

क) विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करणे.

इयत्ता तिसरीपासून प्रत्येक शालेय विद्यार्थ्यांना दरमहा किमान दोन पुस्तके वाचण्यासाठी प्रवृत्त करणे, त्यासाठी पुढील उपाययोजनांचा अवलंब करण्यात येईल.

१) दररोज परिपाठाच्या वेळी एका पुस्तकाचा परिचय करून देणे.

दररोज राष्ट्रगीत व प्रार्थनेनंतर तीन ते पाच मिनिटांत एका पुस्तकाचा परिचय करून द्यावा म्हणजे विद्यार्थ्यांना त्या पुस्तकाबद्दल गोडी निर्माण होईल.

२) दोरीवरचे तरंगते वाचनालय

दर शनिवारी प्रत्येक वर्गात शाळा सुरू होण्यापूर्वी दोरी टांगून त्यावर पुस्तके ठेवण्यात येतील, म्हणजे विद्यार्थी पुस्तके चाळतील व हाताळतील. प्रत्येकाला एक पुस्तक घरी वाचायला देण्यात येईल.

३) प्रत्येक विद्यार्थ्याने वाचलेल्या पुस्तकांबाबत वहीमध्ये (दरमहा दोन म्हणजे वर्षभरात सुट्यांचे दोन महिने सोडून उर्वरित दहा महिन्यांत वीस पुस्तकांबाबतचा परिचय आपल्या भाषेत

लिहावा, त्यात कथानक, काय आवडले व काय आवडले नाही व कसा बोध घेतला अशा चार भागात लिहावा. त्यामुळे ते उत्तम वाचक बनतील.

ड) प्रत्येक तालुक्यात विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन भरवण्यात येईल.

१) दरवर्षी प्रथम प्रत्येक शाळेत कथा, कविता, निबंध, विज्ञानविषयक लेख आणि पर्यावरण/ इतिहास/ महापुरुषांची जीवन चरित्रे यावर स्पर्धा घेऊन दहा विद्यार्थी निवडण्यात येतील व त्यांना तालुक्यातील एका गावी शालेय साहित्य संमेलनात नेण्यात येईल. तेथे दिवसभर विद्यार्थी आपले साहित्य सादर करतील. त्यासाठी आर्थिक तरतूद असलेला एक शासन निर्णय काढण्यात येईल.

२) महाविद्यालये व विद्यापीठात बुक क्लब स्थापन केला जाईल व विद्यार्थी प्रतिनिधींमध्ये ग्रंथालय सचिव हे पद निर्माण करून विद्यार्थी अधिसभेत या पदाचा समावेश करण्यात येईल.

३) सर्व शासकीय/निमशासकीय/ महाविद्यालय वसतिगृह/आश्रमशाळा, सर्व तालुका व जिल्ह्यातील शासकीय/ निमशासकीय कार्यालयात ग्रंथालय स्थापन करण्याचा शासन निर्णय काढण्यात येईल. तसेच सर्व कर्मचारी व कामगार संघटनांना देखील ग्रंथालय स्थापनेसाठी करण्यासाठी व अभ्यास वर्ग चालविण्यासाठी उत्तेजन देण्यात येईल. या सर्व छोट्या ग्रंथालयांसाठी साखळी ग्रंथालय योजना राबविण्यात येईल.

४) दरवर्षी प्रत्येक तालुक्यात वाचक साहित्य संमेलन भरवण्यात येईल जेथे वाचक केंद्रस्थानी असतील. त्यासाठी एक योजना साहित्य महामंडळाच्या मदतीने तयार करावी आणि त्यांना ठराविक अनुदान देण्यात येईल.

## ५.१७ मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी वित्तीय तरतूद

हे धोरण स्वीकारल्यानंतर शिफारशींप्रमाणे कार्यक्रम बनवावा लागेल व त्यासाठी निधीची तरतूद करावी लागेल. त्यावरच मराठी भाषा धोरणाची यशस्विता अवलंबून असेल.

सबब पुढील शिफारशी करण्यात येत आहेत.

५.१७.१ मराठी भाषा विभागास सर्व तरतुदी अंमलात आणण्यासाठी भरीव निधी लागणार आहे, त्यामुळे २०२४-२०२५ या आर्थिक वर्षांपासून रुपये १०० कोटींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येईल.

५.१७.२ ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी - खास करून ग्रंथालयांना अनुदान व ग्रंथपालांना वाढीव वेतन देता यावे म्हणून गोवा सरकारने जसा सर्व प्रकारच्या मद्यावर प्रति लिटर १.५० रुपये ग्रंथालय उपकर लावला आहे तसा रुपये दोन एवढा उपकर लावावा. हा जमा होणारा पैसा ग्रंथालये अद्ययावत करण्यासाठी व प्रत्येक ग्रंथालयात सातत्याने वाचन संस्कृतीच्या विकासासाठी कार्यक्रम घेण्यासाठी वापरण्यात यावा.

५.१७.३ जिल्हा नियोजन व विकास समिती- DPDC मध्ये मराठी भाषा विकास कार्यक्रम नावाचे नवे शीर्ष समाविष्ट करण्यात येईल व जिल्ह्यातील मराठी भाषा धोरणांच्या अनुषंगाने स्थानिक स्तरावर नाविन्यपूर्ण योजनेसाठी दरवर्षी तरतूद करण्यात येईल. किमान १ ते ५ कोटी रक्कम यासाठी राखून ठेवण्यात येईल. भाषा सल्लागार समिती प्रत्येक जिल्ह्यास योग्य कार्यक्रम आखण्यासाठी मदत करील.

५.१७.४  आमदार संचालित स्थानिक विकास निधी मार्फत दरवर्षी किमान २५ लाख रुपये मराठी भाषा विकासासाठीच्या कामासाठी सुचवतील  आणि त्याप्रमाणे ती कामे केली जातील.

५.१७.५  शासनाच्या प्रत्येक विभागाने दरवर्षी अर्थसंकल्पीय तरतूद मागताना प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने मराठी भाषा विकास या नावाने स्वतंत्र तरतूद सादर करण्यात येईल आणि अंमलबजावणीसाठी  सह सचिव/ उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याला  प्राधिकृत करण्यात येईल.

## ५.१८ मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

पुढील २५ वर्षांसाठीचे हे मराठी भाषा धोरण आहे, त्यात आवश्यकतेप्रमाणे वेळीच काही नवे उपक्रम समाविष्ट होऊ शकतात. त्यामुळे सन २०२४ पासून योग्य व चोख अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत:-

५.१८.१  मा. मुख्यमंत्री  मराठी भाषा धोरणाचा अर्ध वार्षिक आढावा घेतील.

५.१८.२  मा. मंत्री, मराठी भाषा व मा. सचिव, मराठी भाषा विभाग दर तिमाहीस सर्व विभागांच्या सचिवांची बैठक घेऊन  धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतील.

५.१८.३  सर्व विभागीय आयुक्तांना मराठी भाषा धोरणासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमले जाईल. त्यांच्या अध्यक्षतेखाली एक स्थायी सल्लागार समिती असेल. त्यात साहित्य परिषद, उद्योजक आणि भाषा सल्लागार समिती आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य हे पदसिद्ध सदस्य असतील.

५.१८.४ प्रत्येक जिल्हास्तरीय मराठी भाषा समितीने दरमहा लोकशाही दिनी सर्व अधिकाऱ्यांची मराठी भाषा धोरणाची आढावा बैठक घ्यावी. सदर बैठकीस जिल्ह्यातील भाषा सल्लागार समिती व  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य कायम निमंत्रित असतील.

५.१८.५  दरवर्षी मा. मंत्री, मराठी भाषा मागील वर्षात मराठी भाषा धोरणाच्या झालेल्या कामाचा अहवाल विधिमंडळात सादर करतील व त्यावर चर्चा होईल, असे प्रावधान करण्यात यावे.

## ५.१९ संकीर्ण

५.१९.१ सर्व क्षेत्रात मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी म्हणून कर्नाटक सरकारच्या धर्तीवर "मराठी भाषा विकास प्राधिकरण"स्थापण्याचा कायदा करण्यात येईल आणि अर्धन्यायिक अधिकार असणारे मराठी भाषा विकास प्राधिकरण स्थापन केले जाईल.

५.१९.२ महाराष्ट्र राज्य पातळीवर नॅशनल बुक ट्रस्टप्रमाणे, "महाराष्ट्र पुस्तक न्यास" (MBT) स्थापन करण्यात येईल व त्याद्वारे ज्ञान, विज्ञान आणि साहित्याची दर्जेदार मराठी पुस्तके निर्माण करून ती विद्यार्थी आणि प्रौढ वाचकांना अल्प किंमतीत उपलब्ध करून दिली जातील.

५.१९.३ महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय सौर दिनदर्शिकेप्रमाणे सौर दिनांक नमूद करण्याचा निर्णय घेतलेला होता. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याकरिता शासकीय व निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, महामंडळे, मंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या, अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे इत्यादी आस्थापनांच्या कामकाजात तसेच पत्रव्यवहारावर व धनादेशांवर सौर दिनांक नमूद करणे बंधनकारक केले जाईल.

५.१९.४ भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आयआयटी), राष्ट्रीयीकृत अधिकोष (Nationalized Banks) आणि ज्या ज्या केंद्रीय स्पर्धा परीक्षा मराठी भाषेतून देता येतात त्यांची माहिती युवकांना देऊन त्यांचे प्रबोधन केले जाईल. अशा ज्या परीक्षा मराठी भाषेतून देता येत नाहीत त्या पुढील काळात मराठी भाषेतून देता याव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पाठपुरावा करण्यात येईल.

५.१९.५ राज्यातील केंद्र सरकारच्या, राज्य शासनाच्या तसेच खाजगी अशा सर्व आस्थापनांमध्ये दिल्या जाणाऱ्या दस्तऐवज व पत्रव्यवहारात देवनागरीतील स्वाक्षरी ग्राह्य धरली जाईल. ती नाकारणाऱ्या कार्यालयांवर दंडात्मक कारवाई केली जाईल. महाराष्ट्र शासनाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या स्वाक्षरीखाली त्यांच्या नावांची आद्याक्षरे मराठी उच्चारानुसार देवनागरी लिपीत लिहिणे बंधनकारक राहील.

५.१९.६ (अ) अधिकोष (Bank), वित्त संस्था, राज्य शासनाचे विभाग, निमशासकीय विभाग, मंडळे, महामंडळे, जिल्हा व तालुका न्यायालयात आणि राज्यातील केंद्रीय आस्थापनांमध्ये दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरव दिन" तसेच १ मे हा दिवस "मराठी राजभाषा दिन" आणि १४ जानेवारी ते २८ जानेवारी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून साजरा करणे अनिवार्य असेल. ज्या दिवशी कार्यालयाला सुटी असेल त्याच्या लगतच्या कामकाजाच्या दिवशी तो साजरा करणे अनिवार्य असेल.

(ब) तसेच महाराष्ट्रातील सर्व साहित्य परिषदा व महामंडळ, त्यांच्या कार्यरत शाखा, मराठी चित्रपट महामंडळ आणि मराठी नाट्य परिषद व त्यांच्या शाखा सर्व मान्यताप्राप्त व अनुदानित ग्रंथालयात हे दिनविशेष व पंधरवडा साजरे करणे अनिवार्य करण्यात येईल. त्यासाठी दरवर्षी मराठी भाषा विभाग एक वा अनेक विषय (थीम) निवडील, त्या अनुषंगाने चर्चासत्रे, व्याख्याने आदि कार्यक्रम आयोजित केले जातील. या दिनविशेष व पंधरवड्याचा प्रधान हेतू मराठी भाषा व साहित्याची गोडी मुलांना लागावी, तरूणाई मराठी भाषेकडे आकृष्ट व्हावी व तिची अभिव्यक्तीची भाषा मराठी व्हावी हा आहे व त्यासाठी कल्पक व रंजक कार्यक्रम आखण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

५.१९.७ परिवहन क्षेत्रातील (सरकारी व खाजगी) सर्व व्यवहार (वाहनांवरील पाट्या, पत्रव्यवहार, परवाना, स्थानकांवरील माहिती, तिकिटांचे आरक्षण इत्यादी) मराठी भाषेत करणे अनिवार्य असेल. वाहन नोंदणी क्रमांक पाट्या रोमन आणि देवनागरी अशा दोन्ही लिपींमध्ये लावण्याची मुभा देणारे महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक नागरिकांना अवगत केले जाईल. यासंबंधीची माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या दर्शनी भागात प्रदर्शित करणे अनिवार्य असेल.

५.१९.८ संकुलांची नावे देवनागरी लिपीत देण्यासाठी प्रोत्साहनपर योजना राबवण्यात येतील.

५.१९.९ नगररचना विभागाकडून मोठी निवासी संकुले उभारण्याची परवानगी देताना त्यामध्ये एक सुसज्ज ग्रंथालय उभारण्याची अट घातली जाईल.

५.१९.१० शासन, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था यात, सार्वजनिक-खाजगी-सहभाग (पीपीपी) तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांमध्ये मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य असेल.

५.१९.११ उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत महाराष्ट्राच्या सहा महसुली विभागामध्ये सुरू असणाऱ्या पूर्व-आय.ए.एस प्रशिक्षण केंद्राचा विस्तार करून तेथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा तसेच देश व राज्य स्तरावरच्या विविध स्पर्धा परीक्षा, भारतीय सेनेतील अधिकारी भरतीच्या परीक्षा आणि बँक-विमा आदिंच्या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येईल. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी एक ओपन व फ्री सोर्स असलेले मराठी वेब पोर्टल आणि एक स्पर्धा परीक्षा मासिक सुरू करण्यात येईल. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागारवजा मार्गदर्शक (मेंटरिंग) समिती नियुक्त करून कार्यरत अधिकाऱ्यांची व्याख्याने, मुलाखती आदिंद्वारे अधिकचे प्रशिक्षण व मार्गदर्शनाची व्यवस्था निर्माण करण्यात येईल.

५.१९.१२ मराठी टंकलेखक व लघुलेखक तयार करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व प्रशिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रमाचे प्रमाणीकरण करण्यात येईल.

५.१९.१३ महाराष्ट्राचा भाषिक आणि वाङ्मयीन नकाशा तयार करण्याचे काम हाती घेण्यात येईल. त्या नकाशात साहित्यिकांच्या गावांचा, शहरांचा उल्लेख असेल. अशी शहरे पर्यटन स्थळे म्हणून विकसित केली जातील.

५.१९.१४ महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती यांना त्यांच्या क्षेत्रात होऊन गेलेल्या नामवंत मराठी साहित्यिकांची माहिती घेऊन त्यांच्या वास्तू आणि वस्तू जतन करण्यासाठी उद्युक्त केले जाईल. त्यांचे संग्रहालय व स्मारक उभारण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास यंत्रणेमार्फत अर्थसाहाय्य दिले जाईल. याशिवाय अन्य राज्यांत होऊन गेलेल्या मराठी साहित्यिकांच्या वास्तू व वस्तू जतन करण्यासाठी त्या त्या राज्यातील मराठी साहित्य संस्थांना साहाय्य करण्यात येईल व संबंधित राज्याची मदत घेतली जाईल.

५.१९.१५ महाराष्ट्र शासनाच्या "लोकराज्य" या मासिकामध्ये मराठी भाषा विकास, प्रसार व प्रचारार्थ २ ते ४ पृष्ठे राखून ठेवण्यात येतील.

५.१९.१६ महाराष्ट्रातील लोकांनी महाराष्ट्राबाहेर जाऊन स्थापन केलेल्या राज्यांचा इतिहास लिहिला जाईल.

५.१९.१७ जगातील टंक विकासकांना राज्याकडे आकर्षित करण्याच्या दृष्टीने "उत्कृष्ट देवनागरी टंक" पुरस्कार योजना तयार करण्यात येईल आणि पारितोषिक प्राप्त टंक वापरास प्रोत्साहित केले जाईल.

५.१९.१८ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ दरवर्षी साहित्यिकांना पुरस्कार देते, त्यामध्ये सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांवर आधारित विवेचनात्मक कायद्यांची पुस्तके मराठीत लिहिणाऱ्या लेखकांना पुरस्कार देण्यात येईल.

५.१९.१९ मराठी भाषा विकासासाठी काम करणारे लेखक, कोशकार आणि भाषा विकासात योगदान देणाऱ्या संस्था यांना सन्मानित केले जाईल तसेच त्यांना आर्थिक साहाय्य केले जाईल.

५.१९.२० मराठी भाषेचा सर्वोत्कृष्ट वापर करणाऱ्या औद्योगिक संस्था/कारखाने यांना शासनाच्या वतीने दरवर्षी पुरस्कार दिला जाईल.

५.१९.२१ महाराष्ट्रातील सर्व रेल्वे स्थानके व बस स्थानके यांची नावे मूळ मराठी नावानुसार असतील. नावातील 'ळ', 'ट', 'ण' यांचे 'ल', 'त', 'न' असे हिंदीकरण होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

५.१९.२२ मराठी भाषा संवर्धनाचे कार्य जनतेत तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासन प्रणित, मंडळे, महामंडळे व उपक्रमांमध्ये मराठी भाषा संवर्धन समित्या स्थापन केल्या जातील. या समितीत काही तज्ज्ञ अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल. सदर मराठी भाषा संवर्धन समित्या आपापल्या कार्यक्षेत्रात कल्पकतेने आणि उपक्रमशीलतेने मराठीच्या विकासाची कामे सातत्याने करतील.

५.१९.२३ सदर मराठी भाषा धोरण अंमलात आणण्यासाठी संबंधित मंत्रालयीन विभागाचे जे अधिकारी व कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. त्यासाठी कार्यवाहीची नियमावली शासन तयार करील.

=०=०=०=०=०=०=०=०=

## ६. मराठी भाषा धोरणाच्या कालबद्ध अंमलबजावणीचा कृती आराखडा

प्रस्तुत “मराठी भाषा धोरण २०२३” हे आगामी २५ वर्षांसाठी असले तरी शासनाने हे धोरण स्वीकारल्यानंतर त्यातील शिफारशींची अंमलबजावणी पुढील ३ ते ५ वर्षांत करण्याच्या दृष्टीने पुढील कृती आराखडा प्रस्तावित करण्यात येत आहे:-

१) महाराष्ट्र शासनामार्फत २०२३-२४ या आर्थिक वर्षात सदरचे धोरण विधिमंडळात मांडून व ते मंजूर करून घेऊन ते सन २०२४ पासून लागू करण्यात येईल.

२) मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात रुपये शंभर कोटींची तरतूद शासनाने करावी व ती टप्याटप्याने दरवर्षी वाढवावी. त्यासाठी मराठी भाषा विभाग चालू आर्थिक वर्षात या धोरणाच्या अनुषंगाने नवीन कार्यक्रम वित्त विभागाकडून मंजूर करून घेईल.

३) शासनाचा प्रत्येक विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था व अन्य उपक्रमांनी मराठी भाषा धोरण मंजूर होताच त्यांच्या विभागाच्या कार्यक्रमांसाठी पुढील आर्थिक वर्षासाठी तरतूद प्रस्तावित करून ती मंजूर करून घ्यावी व प्रत्येक शिफारशीच्या अंमलबजावणीसाठी कार्यक्रम जाहीर करून व शासन निर्णय काढण्याची कार्यवाही करावी व पुढील वर्षापासून कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.

४) मराठी विद्यापीठ हे पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी म्हणजेच माहे जून ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत शासनामार्फत सुरू केले जाईल व तद्नंतरच्या ३ वर्षांत ते पूर्णपणे कार्यरत केले जाईल.

५) मराठी भाषा भवनाची निर्मिती पुढील दोन वर्षांत म्हणजेच २०२५-२६ च्या आर्थिक वर्षअखेरपर्यंत केली जाईल.

६) मराठी ज्ञानभाषा म्हणून पूर्णांशाने विकसित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना केली जाईल व तिला सल्ला देण्यासाठी सल्लागार समितीची स्थापना हे धोरण मंजूर झाल्यावर सहा महिन्यांत केली जाईल.

७) नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने सर्व ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान आणि सामाजिक व मानव्य विभागांचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण मराठीतून देण्यासाठी अभ्यासक्रमाची पाठयपुस्तके व पूरक संदर्भ ग्रंथ निर्माण करण्याकरिता “महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा” ची पुन:स्थापना केली जाईल.

८) मराठी विकिपीडिया हा ज्ञानकोश समृद्ध करणे आणि विक्शनरी व विकिस्रोत या मुक्त ज्ञानस्रोतात सर्व महत्त्वाची वैचारिक, ज्ञान-विज्ञान, अर्थशास्त्र आदि सर्व विभागांची पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी एक सल्लागार समिती स्थापन केली जाईल आणि विविध विद्यापीठे/ नामांकित शिक्षण संस्था, प्राध्यापक, अभ्यासक आणि पत्रकारांमार्फत दरवर्षी एक लाख लेख व संदर्भ मराठीतून लिहवून घेऊन ते अपलोड करण्याची व उपलब्ध लेखांचे नवीन संदर्भ देत अद्ययावत करण्याची योजना तयार करण्यात येईल.

९) चित्रपट, नाट्य, रेडिओ/दूरदर्शन, नृत्य आणि संगीत या माध्यमांसाठी प्रशिक्षित कलावंत, तंत्रज्ञ, लेखक व संपादक इत्यादींची वाढती मागणी लक्षात घेऊन आणि या क्षेत्रातील रोजगार मराठी

लोकांना अधिक प्रमाणात मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत मनोरंजन विद्यापीठ दोन वर्षांत स्थापन केले जाईल.

१०) मराठी चित्रपट, नाटकांना थिएटर उपलब्ध करून देण्यासाठी आणि साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हक्काची जागा वाजवी दरात मिळण्याकरिता आणि त्याद्वारे मराठीचा विकास होण्यासाठी "तालुका तेथे क्रीडासंकुल" या योजनेप्रमाणे "तालुका तेथे चित्र- नाट्य सांस्कृतिक संकुल" बांधण्याची योजना शासनामार्फत मंजूर करण्यात येईल आणि पुढील दहा वर्षांत ती पूर्णपणे कार्यान्वित करण्यात येईल.

हा कृती कार्यक्रम महत्त्वाच्या विषयांचा कृती कार्यक्रम असला तरी तो नमुन्यादाखल असून, सर्वंकष नाही याची भाषा सल्लागार समितीस जाणीव आहे. त्यामुळे धोरण मंजूर झाल्यावर कार्यरत भाषा सल्लागार समिती वेळोवेळी विविध शिफारशींच्या अनुषंगाने कृती कार्यक्रम शासनास सुचवील व शासन, संबंधित विभागामार्फत त्यानुसार कार्यवाही करील.

=०=०=०=०=०=०=०=०=

## ७. मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये भाषा सल्लागार समितीची भूमिका व कामे

१. भाषा सल्लागार समिती राज्य शासनाला मराठी भाषेचे संवर्धन व विकास यासंबंधात वेळोवेळी उद्भवणाऱ्या भाषिक प्रश्नांच्या बाबतीत आवश्यकतेप्रमाणे सल्ला देईल. तसेच मराठी भाषेच्या सर्व क्षेत्रातील प्रभावी वापरासाठी शिफारशी करील.

२. माहिती तंत्रज्ञानामुळे मराठी भाषेच्या वापरावर होणाऱ्या परिणामांना सामोरे जाताना मंत्रालयीन विभागांनी मराठी भाषेच्या संबंधातील कोणतेही निर्णय घेण्यापूर्वी मराठी भाषा विभागाचा सल्ला घेणे आवश्यक असेल.

३. भाषा सल्लागार समितीने तयार केलेले व शासनाने स्वीकारलेले मराठी भाषा धोरण, राज्य शासनाचे सर्व विभाग, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, आस्थापना, स्वायत्त संस्था, तसेच शासनमान्य, अशासकीय अनुदानित व मान्यताप्राप्त संस्था यांना बंधनकारक राहील. तसेच यांच्यापैकी कोणताही विभाग अथवा संस्था आपले भाषाविषयक धोरण परस्पर ठरविणार नाही.

४. राज्याच्या भाषा धोरणात निर्दिष्ट नसलेल्या कोणत्याही आकस्मिक भाषिक बाबींविषयी निर्णय घेण्यापूर्वी संबंधित विभागाने वा संस्थेने मराठी भाषा विभागामार्फत भाषा सल्लागार समितीशी विचारविनिमय करणे बंधनकारक राहील.

५. राज्य शासन वेळोवेळी भाषा सल्लागार समितीकडून भाषाविषयक सल्ला घेईल. राज्याच्या प्रस्तुत भाषा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व त्याकरिता आवश्यक त्या यंत्रणेची उभारणी करून ती चालविण्यासाठी शासन भाषा सल्लागार समितीचे साहाय्य घेईल.

६. भाषा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होते की नाही यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी मराठी भाषा विभागाची असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीच्या मूल्यमापनासाठी स्वतंत्र भाषा परीक्षण यंत्रणा निर्माण केली जाईल.

७. मराठी भाषेच्या विकासासाठी काम करणाऱ्या शासकीय संस्थांच्या कामात सुसूत्रता येण्यासाठी व समन्वय राखण्याकरिता त्यांची कार्यालये एके ठिकाणी असावीत यासाठी मराठी भाषा भवनाची निर्मिती करण्यात येईल.

८. या मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा दर तीन वर्षांनी घेतला जाईल व जनतेला उपलब्ध करून दिला जाईल.

९. दरवर्षी शासनाचे सर्व विभाग, आर्थिक वर्ष संपताच ३० एप्रिल पर्यंत मराठी भाषा धोरणासंदर्भात विभागाने केलेल्या कामाचा अहवाल मराठी भाषा विभागाकडे सादर करतील. मराठी भाषा मंत्री संकलित अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवतील व पावसाळी अधिवेशनात यावर चर्चा घडवून आणली जाईल.

१०. या धोरणाशी विसंगत असणारे पूर्वीचे सर्व शासन निर्णय निरस्त समजण्यात येतील. तसेच राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला या मराठी भाषा धोरणाशी विसंगत असे निर्णय घेता येणार नाहीत तसे निर्णय घेण्यात आल्यास ते आपोआप निरस्त होतील.

११. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तयार करण्यात आलेल्या या मराठी भाषा धोरणाचे दर ०५ (पाच) वर्षांनी पुनर्विलोकन करण्यात येईल. सूचित कालावधीप्रमाणे धोरणाची अंमलबजावणी किती झाली आहे व कोणकोणती कामे व्हावयाची आहेत, या दोन्हींचा विचार पुनर्विलोकनात होईल. तसेच कालपरत्वे निर्माण होणारे प्रश्न लक्षात घेऊन मराठी भाषा धोरणात आवश्यक ते बदल करण्यात येतील.

=०=०=०=०=०=०=०